मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ५२ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● डिसेंबर २००२

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

उद्योग प्रेरणा

## तरुणांसाठी एक नवा उपक्रम - आंबा विक्री

- **काशिनाथ उर्फ प्रकाश श्रीधर** (पृ.१९) दादर, मुंबई.

***प्रकाश मराठे हे मुंबईतील एक उपक्रमशील उद्योजक सभासद. पहा 'उद्योग त्रिमूर्ती-प्रकाश सुहास व सतीश मराठे', हितगुज, अंक ३५, सप्टेंबर १९९८. अमराठी व्यापारी-उद्योजक घराण्यांत प्रचलित असणारी Business House ही कल्पना मराठे कुळांत रुजवणाऱ्या मूळ कोकणातल्या पुरळच्या मराठे बंधूंची समस्त कुलबांधवांसाठी व्यापक स्वरूपाची आंबा विक्री योजना.***

मराठे प्रतिष्ठानने उद्योग प्रेरणा हा उपक्रम काही वर्षांपूर्वी सुरू केला. कै. श्री. सुरेशभाऊंनी या उपक्रमाबाबतीत खूप प्रयत्न केले. परंतु त्यांच्या हयातीत त्यांना या उपक्रमाचे फलीत अंशतः देखील दिसून आले नाही. परंतु काही वनस्पती जशा लागवडीनंतर बऱ्याच कालावधीनंतर वाढीस लागतात तसेच उद्योग प्रेरणा या उपक्रमाचे होत चालले आहे. माझ्या स्वतःच्या व कुटुंबाच्या बाबतीत हाच अनुभव आहे. मी व माझे दोन बंधू यांची नोकरी स्थिर असूनसुद्धा नोकरी सोडून निरनिराळे व्यवसाय सुरू केले आणि वडिलधाऱ्यांच्या व ईश्वराच्या कृपेने आम्ही त्यात प्रगती करीत आहेत.

'हापूस आंबा' ही मुंबईकरांची पर्वणी. पूर्वीपासून हा रत्नागिरी हापूस म्हणून ओळखला जावयाचा. परंतु रत्नागिरीच्या विभाजनानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील आंब्याला 'देवगड हापूस' ही स्वतःची ओळख सर्वच बाबतीत उजवा असल्याने सिद्ध करता आली. आज हापूस आंबा म्हटल्याने 'देवगड' हे नाव लोकांच्या झटकन तोंडात येते.

आंब्याचा व्यापार अडत्यांच्या हातात. ते पैसा कमवून गबर झाले व उत्पादक शेतकरी आहे तसाच आहे. दलाल लावील तो भाव. आंबा त्यालाच पाठविणे भाग. कृषी उत्पन्न बाजार समितीची बंधने असल्याने शेतकरी आपला आंबा कोणाला खाजगीरीत्या विकू शकत नसे. अशा रीतीने शेतकरी दलालाच्या हातातले बाहुले बनला. आपली स्वतःची वस्तु असूनही मिंधेपणा करत रहाण्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हते.

या वर्षी महाराष्ट्र सरकारने कृषी उत्पन्न बाजार समितीची शेतीमाल विक्रीवरील मक्तेदारी संपुष्टात आणून एक धाडसी पाऊल उचलले आहे. या योजनेचा आधार घेऊन आम्ही मराठे बंधू व आमचे नातेवईक मु. सौदाळे (ता. देवगड) येथील श्री. गोखले बंधू यांनी असे ठरविले की २००३ साली उत्पादित होणारा आंबा ५ ते ६ डझनाच्या पेटीत विक्रीसाठी (किरकोळ) भरण्याऐवजी २ डझन फळे राहणारा कारुगेटेड बॉक्स किरकोळ विक्रीसाठी तयार करावयाचा व तो वाजवी भावात द्यावयाचा.

आपल्या परिवारातील तरुणांना अल्प भांडवलात एका छोट्या व्यवसायाला सुरवात करता येईल या दृष्टीने **समस्त मराठे कुलबांधवांना व विशेषतः तरुण वर्गाला या उपक्रमात सामील होण्याचे आवाहन करीत आहे.**

**इच्छुक कुलबांधवांनी याबाबत त्वरित संपर्क साधावा. पत्ता खाली दिला आहे.**

*कचेरीचा पत्ता :* मे. योगसंजीवनी अेंटरप्राईज, १५, न्यू शॉपींग सेंटर, गव्हर्नमेंट कॉलनी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : ६५१६४६४

*निवासाचा पत्ता :* २/७, कान्हेरे बिल्डिंग, डॉ. डिसिल्व्हा रोड, दादर, मुंबई - ४०० ०२८.
दूरध्वनी : ४३६०७८१.

***

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ सभा**

महिन्याच्या २ऱ्या शनिवारी सायं. ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. ४थ्या शनिवारीहि गरजेनुसार सभा घेण्यात येते. सभेच्या दिवशी सायं. ५ वाजता कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटू शकतो.

मागील तिमाहीत २१ सप्टेंबर, १२ ऑक्टोबर आणि ९ व २३ नोव्हेंबर रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या.

**शैक्षणिक मदत**

२१ सप्टेंबरच्या सभेत श्रीमती प्रतिभा उल्हास मराठे यांच्या अर्जानुसार त्यांचे दोन मुलगे पराग व समीर यांना प्रत्येकी रु. ३००० प्रमाणे एकूण रु. ६००० शैक्षणिक मदत मंजूर करण्यात आली.

## हितगुज समिती आवाहन

१९९४ मार्च अंकापासून संपादक लक्ष्मण शंकर हे जवळजवळ एक हाती त्रैमासिक हितगुज प्रसिद्ध करण्याचे काम करीत आहेत. यापूर्वी मार्च ९८ व डिसेंबर ९८ च्या अंकांत या कामांत अधिकाधिक कुलबांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले होते. तसेच जून ९६ च्या अंकांत हितगुजच्या संपादनाची स्वतंत्रपणे जबाबदारी घेऊ इच्छिणाऱ्या कुलबांधवांनी प्रतिष्ठानशी संपर्क साधण्याचेहि आवाहन करण्यात आले होते.

हितगुजच्या कामात अधिकाधिक कुलबांधवांचा सहयोग मिळावा म्हणून एक 'हितगुज समिती' स्थापन करण्याच्या २०.८.९८ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ठरावाचा पुन्हा एकदा जोमाने पाठपुरावा करण्याचे ठरले आहे. अक्षरजुळणी (डीटीपी), छपाई, मजकुराची मांडणी, सजावट इ. कामांची माहिती व आवड असणाऱ्या कुलबांधवांनी कृपया प्रतिष्ठानशी त्वरित संपर्क साधावा.

**बिनव्याजी कर्ज**

तेजस शि. मराठे, पुणे याला उच्चशिक्षणासाठी रु. १०,००० बिनव्याजी कर्ज मंजूर करण्यात आले.

**हितगुज**

हितगुजचे स्वरूप व्यापक करून केवळ कपिगोत्री मराठे कुटुंबियांपुरतेच मर्यादित न ठेवता अखिल ब्राह्मण समाजाला उपयुक्त पद्धतीने ते चालवावे, त्रैमासिकाऐवजी मासिक करावे अशी सूचना श्री. ह. मो. मराठे यांनी केली होती. त्याबद्दल साधक बाधक विचार करून कपिगोत्री मराठे कुटुंबियांची त्रैमासिक पत्रिका हेच स्वरूप कायम ठेवावे असे ठरविण्यात आले.

**उद्योग प्रवर्तन**

उद्योग प्रवर्तन उपक्रम अजून नीट मूळ धरीत नाही त्यासाठी काय करता येईल याबाबत चर्चा झाली. **श्री. काशीनाथ श्रीधर उर्फ प्रकाश मराठे** यांनी कोकणातील आंबा मुंबईत विकण्याची योजना सादर केली आहे. या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन या अंकात स्वतंत्रपणे करण्यात आले आहे. ***

## जाहीर निमंत्रण

### वर्धापन दिन समारंभ - पुणे शाखा

मराठे प्रतिष्ठानचा २४वा वर्धापन दिन रविवार दिनांक २६ जानेवारी २००३ रोजी साजरा होणार आहे.

**कार्यक्रम**

१. ताणतणाव मुक्त जीवनावरील रचनात्मक कार्यशाळा, संयोजक **श्री. अनुरुप मराठे** (यासाठी प्रत्येकाने पेन किंवा पेन्सिल घेऊन यावे)

२. **सौ. प्राची मराठे** यांचे शास्त्रीय व सुगम संगीत गायन.

**पुण्यातील व पुण्याबाहेरील सर्व कुलबांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे व कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही विनंती.**

**कार्यक्रम विनामूल्य आहे.**

स्थळ : वेदशास्त्रोत्तेजक सभेचे सभागृह, पेशवे पार्क चौक, विश्व हॉटेल समोर, पुणे ४११ ०३०.

वेळ : सायंकाळी ४.३० ते ७.३०

## पुणेकरांसाठी आवाहन - हितगुज वाटपाबाबत

**- सौ. नीलांबरी रमेश** (पृ. २८०), पुणे

पुण्यातील हितगुज वर्गणीदारांना त्रैमासिक अंक प्रत्यक्ष घरी जाऊन देण्यात येतो. आतापर्यंत ४ अंक वाटले गेले आहेत. ते आपणा सर्वांना मिळाले असतीलच.

मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर महिन्यांच्या २० तारखेपर्यंत आपणास हितगुज त्रैमासिकाचा अंक घरपोच मिळाला नाही तर आपल्या विभागात अंकवाटप करणाऱ्या कुलबांधवांना फोन करून अंकाची चौकशी करावी किंवा स्वत: त्यांच्या घरी जाऊन अंक घेऊन यावा ही विनंती.

निरनिराळ्या विभागांत अंकवाटप करणाऱ्या कुलबांधवांची माहिती खालीलप्रमाणे :-

१. **बुधवार पेठ, शुक्रवार पेठ** - अच्युत महादेव चक्रदेव, २६ शुक्रवार पेठ, मायबोली लायब्ररीचे वर, भाऊ महाराज बोळ. (टेलि. ४४८१२८३)

२. **सदाशिव पेठ मित्रमंडळ** - अरुण दत्तात्रय मराठे, १७५९ सदाशिव भिकादास मारुतीजवळ, पुणे (टेलि. ४४७३२८१)

३. **लोकमान्यनगर** - लक्ष्मण गणेश मराठे, ४९/७५८ लोकमान्यनगर, नवी पेठ, दांडेकर पुलाजवळ, पुणे (टेलि. ४३३७१८६)

४. **दत्तवाडी, सिंहगड रोड** - श्रीकृष्ण सिद्धेश्वर मराठे, F/६, कीर्तीनगर, वडगांव बुद्रुक, पुणे (टेलि. ४३५१२८४)

५. **सहकारनगर** - कर्नल प्रमोदन प्रभाकर मराठे, A-१ उषा अपार्टमेंट, तुळशीबागवाले कॉलनी, पर्वती, सहकारनगर नं. २, पुणे (टेलि. ४२२४७८९)

६. **सदाशिव पेठ, नारायण पेठ** - मुकुंद

Marathe Pratishthan

सीताराम मराठे, ५९८-९९ सदाशिव पेठ, कॉमन वेल्थ शेजारी, मराठे वाडा, पुणे (टेलि. द्वारा ४४५०६२९)

७. **शनिवार पेठ, बुधवार पेठ** - सौ. नीलांबरी रमेश मराठे, व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र, ६४३ नारायण, प्राथमिक नू. म. वि. शाळेसमोर, पुणे (टेलि. ४४५६२७०)

८. **रास्ता पेठ** - प्रमोद विष्णू मराठे, ५०१ रास्ता पेठ, आदित्य बिल्डिंग, पुणे (टेलि. ६१२८०९३)

९. **एरंडवणे, डेक्कन जिमखाना, प्रभात रोड, भांडारकर रोड** - अनिल लक्ष्मण मराठे, ५ आलोक सोसायटी, ७० बी/४ प्रभात रोड, गल्ली क्र. १५, एरंडवणे, पुणे (टेलि. ५६५१३२३)

१०. **पौड फाटा** - श्रीनिवास गोपाळ मराठे, दख्खन पाटबंधारे सोसायटी, ३९/९ त्रिवेणी नं. १, एरंडवणे, S.N.D.T. कॉलेजसमोर, पुणे (टेलि. ५४६४७०६)

११. **पौड फाटा, आयडियल कॉलनी, मयूर कॉलनी** - विष्णू रामचंद्र मराठे, ४/१ झाला अपार्टमेंट, मारुती मंदिरासमोर, कोथरूड, पुणे २९ (टेलि. ५४५०७२०)

१२. **कोथरूड, डहाणूकर कॉलनी** - श्रीराम व्यंकटेश मराठे, २/६ चंद्रलोक नगरी, डहाणूकर कॉलनी, गल्ली नं. ११, कोथरूड, पुणे २९ (टेलि. ५४६९२५३)

१३. **कर्वे नगर, नवसह्याद्रि** - मधुकर कृष्णा मराठे, १ शिवाली अपार्टमेंट, चिंतामणी सोसायटी, कर्वे नगर, पुणे. (टेलि. ५४६२२१२)

१४. **पिंपरी** - नितिन विजय मराठे, अजमेरा हौसिंग कॉम्प्लेक्स HCF ६/००३ दत्तमंदिराजवळ, पिंपरी, पुणे १८. (टेलि. ७४८९७७७)

१५. **चिंचवड** - बाळकृष्ण काशिनाथ चक्रदेव, A-४ विंग, फ्लॅट नं. १०, यशोपुरम, पिंपरी-चिंचवड लिंक रोड, चिंचवड, पुणे ३३. (टेलि. ७४६८२६३)

***

# सभासद वृत्त

## मानसन्मान

**आय.बी.ए. चे मानद कार्यवाह सतीश मराठे**

प्रतिष्ठानचे विश्वस्त, मुंबईतील जनकल्याण सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी **सतीश काशिनाथ (पृ.१२९)** यांची भारतातील सर्व बँकांची संघटना इंडियन बँक्स असोसिएशनच्या मानद कार्यवाहपदी एकमताने निवड झाली आहे. बँक ऑफ इंडियामधील नोकरी सोडून त्यांनी सहकारी बँक व्यवसायांत प्रवेश केला. सध्या ते राष्ट्रीय पातळीवर सहकार भारतीचे जनरल सेक्रेटरी म्हणून कार्यरत आहेत. तसेच ते महाराष्ट्र व गोवा अॅपेक्स बँकेचेहि संचालक आहेत.

**मोरेश्वर हरि यांची 'नशा'**

**गोव्यांतील सभासद मोरेश्वर हरि** (पृ५४२) यांच्या 'नशा' या पहिल्या कथासंग्रहाचे औपचारिक प्रकाशन साहित्यरसिक मित्रमंडळ, शिरसईच्या विद्यमाने प्रा. रवींद्र घवी यांनी अनुताई वझे यांच्या निवासस्थानी शिरसई येथे केले. हा प्रकाशन सोहळा १३.१०.२००२ रोजी झाला.

**नॅशनल मेरिट स्कॉलर - राहूल सुरेश**

पुण्यातील सभासद **सुरेश भालचंद्र यांचा मुलगा राहूल** (पृ.२७९) याने मार्च २००१ मधे झालेल्या बी. एससी. (फीजिक्स) या परीक्षेत ८२.३१ टक्के गुण मिळवून पुण्यांतल्या S. P. College मधे१ला व पुणे विद्यापीठात ७वा क्रमांक मिळवला. त्याला विद्यापीठाकडून नॅशनल मेरिट स्कॉलरशिप व S. P. College मधे पहिला आल्याबद्दल ७ स्कॉलरशिप्स मिळाल्या. आता तो M.Sc. (Physics) करीत आहे.

M.Sc.च्या Final मधेहि B.Sc. प्रमाणेच राहूलला घवघवीत यश मिळो अशा सर्व कुलबांधवांच्या शुभेच्छा!

## नांदा सौख्य भरे

१) पुण्यातील सभासद **मोहन बाळकृष्ण** (पृ.५२०) **यांचा मुलगा मंदार** याचा विवाह पुण्यातीलच. प्रकाश गणेश गोडबोले यांची कन्या आरती हिच्याशी पुणे येथे २५.११.२००२ रोजी थाटामाटात साजरा झाला.

२) डिचोली गोवा येथील उद्योजक, सभासद **नीळकंठ परशुराम** (पृ.५२१) **यांची मुलगी नीलम** हिचा विवाह पणजी, गोवा येथील अशोक जोशी यांचा पुण्यात स्थायिक मुलगा शिरीष यांचेशी मुळगांव, गोवा येथे ३०.११.२००२ रोजी थाटामाटात साजरा झाला.

३) वेळगे, गोवा येथील सभासद **सदाशिव नारायण** (पृ.५२१) **यांचा मुलगा सुदीन** याचा विवाह डिचोली गोवा येथील गंगाराम बांदेकर यांची कन्या सुपर्णा हिच्याशी मुळगांव, गोवा येथे १४.१२.२००२ रोजी थाटामाटात साजरा झाला.

**नवविवाहितांना सुखी व संपन्न जीवन लाभो अशा समस्त मराठे परिवारातर्फे शुभेच्छा!**

## खुषीपत्र

**प्रतिष्ठानचे गोव्यातील क्रियाशील सभासद कालिदास बाळकृष्ण (पृ.५४१) यांनी त्यांचे मित्र व लेखक श्री. मोंडकर यांना हितगुजचे काही अंक वाचायला दिले होते. त्याबाबतचे त्यांचे विचार.**

''है त्रैमासिक सुरू करून चालू ठेवण्यासाठी मराठे परिवार जे श्रम घेत आहे त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच. नाहीतर एकदा कुलवृत्तांत प्रसिद्ध झाला की गंगेत घोडे न्हाले असे म्हणून बहुतेक पारिवारिक उपक्रमांना पूर्णविराम मिळतो असे दिसते.''

''किर्लोस्कर खबर'' म्हणून सुरू झालेले असेच एक मुखपत्र. त्याचे एका दर्जेदार मासिकात रूपांतर झाले. माझी पिढी पौगंडावस्थेत व युवावस्थेत असताना तिला नवविचारांची दिशा त्याच मासिकाने दिली. तोच मार्ग हितगुजहि कालांतराने चोखाळू लागेल ही शुभेच्छा.

**- क. र. मोंडकर,**
ढवळी, फोंडा, गोवा

Marathe Pratishthan

## सहवेदना

१) पुण्यातील सभासद **सुहास श्रीपाद यांचे वडील श्रीपाद नारायण** (पृ.४१८) यांचे किर्लोस्करवाडी येथे २८.११.२००० रोजी दु:खद निधन झाले.

२) मुंबईतील **सभासद दत्तात्रेय सखाराम** (पृ.३१४) यांचे **वडील बंधु वासुदेव** यांचा नाशिक येथे जून २००१ मधे मृत्यू झाला. तसेच **त्यांचे पुत्र दिलीप** यांचे मुंबई येथे कॅन्सरने ७.१२.२००१ रोजी दु:खद निधन झाले. त्यांचे वय ५१ होते.

३) **पुण्यातील सभासद सुरेश भालचंद्र** (पृ.२७९) **यांची आई सौ. इंदिराबाई** यांचे २३.६.२००२ रोजी पुण्यात दु:खद निधन झाले. त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्या संपूर्ण आयुष्य जीवनांशी लढा देत खंबीरपणे, कसलीही तक्रार न करता, शांतपणे, हसतमुखाने जगल्या. आनंदी आध्यात्मिक वृत्ती हा त्यांचा स्थायीभाव होता. त्यांनी घरकामाखेरीज विणकाम, शिवणकाम, भरतकाम, क्रेपची फुले, हलव्याचे दागिने इ. कलाकौशल्येहि आत्मसात केली होती. त्यांनी काही दिवस घरातच त्यांचे वर्गहि चालवले होते. त्याचा पुतण्या मीननाथ लक्ष्मण (पृ.२८०) याने त्यांच्या विषयी म्हटले आहे - संसारी राहून श्रद्धाळू बहुत। गोडी होती तिज अध्यात्माची।। अशी होती माझी काकू। जणू मायेची सावली।।

४) दहिसर, मुंबई येथील सभासद **विश्वनाथ काशिनाथ यांचे बंधु शंकर** (पृ५३३) यांचे वयाच्या ७७व्या वर्षी मुलाकडे अहमदाबाद येथे दि. २५.८.२००२ रोजी निधन झाले.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.** ***

## खुषीपत्र

हितगुजचा सुवर्णमहोत्सवी अंक मिळाला. अप्रतिम आहे. जेवढे कौतुक करावे तेवढे कमीच पडेल. 'मराठे प्रतिष्ठान आणि मी' हा **यशवंत सुरेश यांचा लेख** वाचला. त्यांनी व्यक्त केलेले विचार चांगले आहेत. त्या दृष्टीने कार्यकारी मंडळाने विचार करावा.

**- प्रभाकर रामचंद्र खांबेटे**
(पृ.६९५), सिंकदराबाद

# सुगीता मंडळाचे गीताष्टक

***आपले एक सभासद जनार्दन गोविंद (पृ.४०५) हे गेली ४२ वर्षे मुलांना गीता शिकवण्याचे काम अव्याहत करीत आहेत. स्पष्ट उच्चार, विचार, आचार व प्रचार या चार सूत्रांवर वैज्ञानिक दृष्टीने उभारलेले संस्कार मंदिर - 'सुगीता मंडळ', आगाशी, या माध्यमांतून ते हे कार्य करतात. गीतेची गोडी कळावी म्हणून त्यांनी पाठांतरासाठी निवडलेले आठ श्लोक आणि त्यांचे विनोबाजींच्या गीताई मधील मराठी भाषांतर खाली माहितीसाठी दिले आहे.***

| गीता | गीताई |
|---|---|
| श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ज्ञात् ज्ञानयज्ञ: परंतप।<br>सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।। (४-३३) | द्रव्य-यज्ञादिकाहूनि ज्ञान यज्ञचि थोर तो<br>पावती सगळी कर्मे अंती ज्ञानात पूर्णता । (४-३३) |
| तद्विध्दि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।<br>उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन:।। (४-३४) | सेवा करुनि ते जाणो नम्र भावे पुसूनिया<br>ज्ञानोपदेश देतील ज्ञानी अनुभवी तुज। (४-३४) |
| अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितंच यत्।<br>स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते।। (१७-१५) | हितार्थ बोलणे सत्य प्रेमाने न खुपेलसे<br>स्वाध्याय करणे नित्य वाणीचे तप बोलिले। (१७-१५) |
| न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।<br>तत्स्वयं योगसंसिध्द: कालेनात्मनि विन्दति।। (४-३८) | ज्ञानसम नसे काही पवित्र दुसरे जगी<br>योग-युक्त यथा-काळी ते पावे अंतरी स्वये। (४-३८) |
| ईश्वर: सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।<br>भ्रामन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।। (१८-६१) | राहिला सर्व भूतांच्या, हृदयी परमेश्वर<br>मायेने चाळवी त्यांस, जणू यंत्रांत घालुनि। (१८-६१) |
| तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।<br>तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् (१८-६२) | त्यातेचि सर्व-भावे तू जाई शरण पावसी<br>त्याच्या कृपा-बळे थोर शांतीचे स्थान शाश्वत। (१८-६२) |
| युक्ताहार विहारस्य युक्त चेष्टस्य कर्मसु।<br>युक्त स्वप्नाव बोधश्च योगो भवति दु:खहा।। (६-१७) | निजणे जागणे खाणे, फिरणे आणि कार्य हि<br>मोजूनि करितो त्यास, योग हा दु:ख–नाशन। (६-१७) |
| तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ।<br>ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तम् कर्मकर्तुमिहार्हसि।। (१६-२४) | म्हणुनि आदरी शास्त्र कार्याकार्य कळावया<br>शास्त्राचे वाक्य जाणूनी इथे तू कर्म आचरी। (१६-२४) |

***

## वात्रटिका

***मोरेश्वर हरि (पृ.५४२) शिरसई, गोवा, यांनी फेब्रुवारी २००२ मधील गोमंतक मराठे परिवार संमेलनात सादर केलेल्या वात्रटिका***

तिचे आहेत, गोंडस लांब,
लांबसडक, काळे केस,
हाय, परंतु धुताना ते
तिच्या तोंडाला
येतो फेस. ***

नजरेला ती नजर देउनी
कशी पाहते अशी,
जणू ती अशी करे चवकशी
याने अपुली झोकदारशी
कधी कापली मिशी? ***



Marathe Pratishthan

# परदेशांतल्या ब्राह्मण बंधूंना आवाहन

- **दिवाकर गोविंद विद्वांस** (पृ.६४८), आगाशी, जि. ठाणे.

अलिकडे पुष्कळसे सुशिक्षित ब्राह्मण तरुण अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅलीमध्ये स्थायिक झाले आहेत. असे होण्याची कारणे सर्वांना माहीतच आहेत.

सध्या देशांत प्रचलित असलेला जातीय वाद हे त्यांतले प्रमुख कारण. सर्व राजकीय पक्षांचे धोरण ब्राह्मणांना शक्य तितके करून सार्वजनिक जीवनांत अगर उच्च शासकीय नोकऱ्यांत स्थान मिळू द्यावयाचे नाही असे आहे. त्याशिवाय भारतामध्ये शिक्षणाचा प्रसार ज्या वेगाने झाला आहे, त्या वेगाने नोकऱ्या उपलब्ध नाहीत. वशिलेबाजी, भ्रष्टाचार ही आणखीही महत्त्वाची कारणे आहेत. पैसे खर्च केल्याखेरीज कोणतेही काम होत नसल्यामुळे माणसाची लायकी, बुध्दिमत्ता, चारित्र्य अगर कार्यक्षमता यांना सर्वात कमी महत्त्व दिले जाते.

त्यामुळे सुशिक्षित व कर्तबगार ब्राह्मण तरुणांना या देशात संधी नाही ही गोष्ट प्रत्येकाला जाणवते. परदेशांत मात्र वेगळी परिस्थिती आहे. परदेशांमध्ये भारतीय, विशेषत: ब्राह्मण तरुण, कमी पगारावर काम करतात. अधिक काम करतात व त्यांच्या कामाचा दर्जाही अधिक उच्च असतो. त्यामुळे ज्यांना या देशात खालच्या दर्जाची सुद्धा नोकरी मिळू शकत नाही त्यांना परदेशांत मात्र त्यांच्या योग्यतेप्रमाणे नोकरी मिळू शकते.

ब्राह्मणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतंत्र उद्योग धंदा करावा हे म्हणणे ठीक आहे, परंतु या देशांत भ्रष्टाचार केल्याशिवाय स्वतंत्र उद्योग सुरू करता येत नाही; अगर तो चालविता येत नाही अशी परिस्थिती आहे. सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांना भारत सरकारकडून जी वागणूक मिळाली त्यावरून सर्व परिस्थिती स्पष्ट होईल.

या विषयावर कितीही लिहिले तरी ते कमीच होईल अशी परिस्थिती असल्यामुळे या परिस्थितीतून मार्ग काढण्याचा एक विचार मांडत आहे.

ब्राह्मण समाजातील अनेक तरुणांना उच्च शिक्षण घेण्याची बुद्धी आहे, इच्छाही आहे पण आर्थिक सामर्थ्य नाही. त्यासाठी मला असे वाटते की परदेशांत स्थायिक झालेल्या ब्राह्मणांनी मनावर घेतल्यास प्रत्येक कुटुंबाला एक ब्राह्मण विद्यार्थी दत्तक घेणे सहज शक्य आहे. दत्तक घेणे याचा अर्थ त्याच्या शिक्षणाचा व रहाण्याजेवणाचा खर्च कुटुंबाने सोसावयाचा. रहाण्याजेवण्याचा खर्च म्हणजे साधे पण भरपूर व पौष्टिक अन्न; विद्यार्थ्याला शोभतील असे कपडे व शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी. यामध्ये चैनीचा समावेश अर्थातच नाही पण विद्यासंपन्न होण्यासाठी त्या विद्यार्थ्यांना अशी रहाणी स्वीकारावीच लागेल असे झाल्यास ब्राह्मण जातीतील गुणी विद्यार्थ्यांना आपले शिक्षण पूर्ण करता येतील. त्यानंतर त्यांना जगाच्या पाठीवरील कोणत्याही देशात जाऊन आपला जम बसविता येईल.

आजच रेल्वे कन्स्ट्रक्शन, कॉम्प्युटर, इंजिनिअरींग, डॉक्टर्स, नर्सेस, अकाऊंटंट्स वगैरे क्षेत्रांत भारतीयांना भरपूर मागणी आहे. तिचा फायदा घेऊन ब्राह्मण समाजाची पातळी उंचावता येईल.

असे केल्याने आपण जातीयवादी कृत्य करीत आहोत असे मुळीसुद्धा मानण्याचे कारण नाही. कारण ब्राह्मण सोडून इतर सर्व जाती आपापल्या जातीच्या उद्धाराकरता उघड प्रयत्न करीतच आहेत. शीख, जैन, पारशी वगैरे समाजांनी या दिशेने पुष्कळच कार्य केले आहे.

या कामात पुढाकार घेण्यासाठी खरे म्हणजे ब्राह्मण सभेने तयार व्हावयास हवे पण सुरवातीला मराठे प्रतिष्ठानने या कामांत पुढाकार घेतल्यास फार महत्त्वाचे कार्य प्रतिष्ठानने केले असे होईल.

एका विद्यार्थ्याचा शिक्षणाचा भार सोसण्याचे कार्य परदेशस्थ त्याचप्रमाणे स्वदेशस्थ ब्राह्मण बंधू सुद्धा त्यांच्या त्यांच्या ऐपतीप्रमाणे करू शकतात. या दृष्टीने काही व्यावहारिक सूचना करीत आहे.

१) अशा प्रकारच्या दात्यांची यादी तयार करण्यांत यावी.

२) त्यांचेकडून एक वर्षाच्या खर्चाचे पैसे आगाऊ घेऊन ते पैसे एका स्वतंत्र न्यासांत म्हणजे ट्रस्ट फंडात जमा करण्यांत यावे. या न्यासाचा कारभार करण्यासाठी ब्राह्मण समाजातील योग्य व्यक्तींची एक वेगळी कार्यकारी समिती नेमण्यांत यावी.

३) विद्यार्थ्यांची निवड करण्याचे काम एका स्वतंत्र समितीकडे सोपविण्यात यावे. ब्राह्मण समाजांतील शिक्षण तज्ञ, तंत्रज्ञ व इतर क्षेत्रांतील तज्ञ व्यक्तींचे सहकार्य या कामासाठी घेण्यात यावे.

४) हे काम शक्य तितके विना मोबदला करण्यांत यावे.

याशिवाय इतरही काही सूचना केल्या जाऊ शकतात. पण सध्या या विषयाची सुरवातच करावयाची असल्यामुळे मला सुचलेल्या गोष्टी ब्राह्मण समाज व विशेषत: मराठे कुटुंबीय यांचे पुढे मांडीत आहे. संघटना होईपर्यंतच्या काळात व्यक्तिगत पातळीवरहि हे काम करता येईल.

***

## खुषीपत्र

घटना व नियमावली सुटसुटीत व सुंदर आहे. ५१वा अंक नेहमीप्रमाणेच उत्तम आहे. 'मोहाचा क्षण' व 'पेन्शनचा फोटो' दोन्ही कथा आवडल्या.

अत्यंत प्रतिकूल काळात प्रतिष्ठानने केलेले कार्य कौतुकास्पद आहे. त्यासाठी कार्यकारिणी सदस्यांचे आभार मानणे केवळ पुरेसे नाही तर **प्रत्येक सभासदाने कामातील खारीचा वाटा स्वत:हून उचलणे आवश्यक वाटते.**

- **जनार्दन गोविंद** (पृ.४०५),
आगाशी जि. ठाणे

Marathe Pratishthan

# समुपदेशन - कुटुंबस्वास्थ्य टिकवण्याचा प्रभावी उपाय

- **सौ. मंगला प्रवीण** (पृ.३६१), गोरेगांव, मुंबई (टेलि. ८७३६१०८)

*कौटुंबिक कुरबुरी, ताणतणाव, गैरसमज यांचे प्रमाण अलिकडच्या काळात वाढत आहे. शारीरिक आजारावर आपण डॉक्टरकडून वेळीच औषध आणून शरीरस्वास्थ्य टिकवतो. मात्र 'कौटुंबिक आजार' दुर्लक्षित राहतात आणि अनेकदा विकोपाला जातात. अशा वेळी ज्येष्ठ व जाणत्या कुलबांधवांचे मार्गदर्शन निश्चितच उपयुक्त ठरते. या दृष्टीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरविंद दामोदर यांची 'कुटुंब सल्ला समिती' बाबतची संकल्पना ५०व्या अंकात पुनर्मुद्रित केली होती. (पहा अंक ५०, पृ.३)*

*या कल्पनेचे स्वागत करून अशा कार्यात सहभागी होण्याचा मनोदय, गोरेगांव येथील 'स्वाधार' या कुटुंब सल्ला केंद्रात काम करणाऱ्या सौ. मंगला प्रवीण यांनी व्यक्त केला होता. समुपदेशन का व कसे याबाबतचा त्यांचा हा लेख. 'कौटुंबिक आजारा'नी ग्रस्त कुलबांधवांना प्रेरणादायी ठरेल अशी आशा आहे.*

*'विवाहपूर्व मार्गदर्शन' याबाबतचा त्यांचा लेख पुढील अंकांत येईल. - संपादक*

बऱ्याच जणांना समुपदेशन, कटुंब सल्ला केंद्र म्हणजे काय हेच माहीत नसते. सल्ला केंद्राची माहिती असली तरी अशा केंद्रांकडे जाणे म्हणजे घरगुती गोष्टी चव्हाट्यावर आणणे असे लोकांना वाटते. पण प्रत्यक्ष परिस्थिती मात्र अगदी उलट आहे. विसंवाद घरातल्या घरात ठेवल्याने प्रश्न सुटण्याऐवजी चिघळण्याचीच शक्यता जास्त असते. एखादे उदाहरण घेऊन पाहू या.

समजा सीमा आणि अजय यांच्यात काही बिनसायला सुरवात झाली. सामान्यत: नेहमी होते तसे सुरवातीला दोघांनाहि लपवायचा प्रयत्न केला. कुरबुरी वाढत गेल्या. सीमाच्या आईवडिलांनी अजयला, ''सांभाळून घ्या.'' वगैरे सांगितले. सीमालाही सांगितले, ''अग जरा धीराने घे. हळूहळू सगळं ठीक होईल.'' नुसतं ठीक होईल म्हणून काही ठीक होत नाही.

एक दिवस अजयच्या काकांनी दोघांनाही समोर बसवले. ''काय तुमच्या मनात आहे ते सगळं मोकळेपणाने बोला.'' पण सून सासऱ्यांसमोर आणि पुतण्या काकांसमोर कितपत मोकळेपणाने बोलणार? वयाचे आणि नात्याचे बंधन येतेच. काकांनी प्रेमाने समजावलं, ''आता तुम्हाला सगळा जन्म एकत्र काढायचा आहे. तेव्हा एकमेकांना सांभाळून घ्या.''

खरे तर सीमा अजयलासुद्धा तसेच वाटत होते. पण आपले नेमके कां जमत नाही आणि काय केले तर जमेल हेच उमगत नव्हते. थोड्या दिवसांनी आणखी कुणीतरी समजूत घालायला आले. हळूहळू सगळ्या नातेवाईकांमध्ये शेजाऱ्यांमध्ये सतत चर्चा होऊ लागली. प्रत्येकाचा उद्देश चांगला होता. पण आपण कसं समजवावं; आपल्यालाच कशा सगळ्या आतल्या गोष्टी माहीत आहेत, हे प्रत्येकजण दाखवीत होता. त्यामुळे गोष्टी अधिकच षट्कर्णी झाल्या. शिवाय सगळ्यांच्या बोलण्यात ''मुलीच्या जातीने कस नमत घ्यायला हवं'' हा सूर होताच. जिला भोगायला लागते तिला या वाक्याची चीड येते. तसेच सीमाचे झाले. शिवाय आता सगळ्यांना कळल्यावर समझोता करायचा म्हणजे शरण जाणे होईल. आपली पत जाईल म्हणून दोघेहि इरेस पेटले. शेवटी त्यांचा संसार मोडला.

आता समजा हेच सीमा अजय आपलं काहीतरी बिनसतय असे जाणवताच दोघे किंवा दोघांपैकी एकजण, समजा सीमा, कुटुंब सल्ला केंद्रात गेली (जवळ जवळ १०० वेळा स्त्रियाच प्रथम येतात.) केंद्रातील सल्लागार सीमाशी बोलल्या. अजयला बोलावून त्याच्याशी बोलल्या. दोघांनाही आपापल्या समस्या लिहून आणायला सांगितल्या.

## खुषीपत्र

हितगुज सुवर्णमहोत्सवी अंक म्हणजे नेत्रसुखाची आणि विचारधनाची मेजवानीच जणू! अंकांतील चौकटी - त्यांतील मजकुरांतील आशय व बोलकी छायाचित्रे हितगुजचा प्रारंभापासूनचा जीवनपट दर्शविणेत पूर्णपणे सफल झाली आहेत.

हितगुजचा लोगो तयार करणाऱ्या राजाभाऊचे आपल्या सुपुत्रासह सुवर्णमहोत्सवी अंकाच्या सजावटीत पूर्णपणे योगदान असावे हा तर 'मणि कांचन' योगच! यामागील संपादकांची योजकता कौतुकास्पद!! अंकांतील साहित्याचे रसग्रहण व मांडणीतील सौंदर्यदृष्टी यांचे किती व कसे कौतुक करावे? कदाचित तो एक स्वतंत्र अंकच होईल.

मुखपत्राच्या जन्मापासून त्याच्या संगोपनासाठी, वाढीसाठी, ज्यांनी तन मन धन रूपाने अपार कष्ट घेतले त्या ज्ञात-अज्ञात सर्वच बांधवांचे ऋण सुवर्णमहोत्सव प्रसंगी कायम वागविण्यात आनंद व कृतज्ञता व्यक्त होईल.'

'प्रारंभ' ही **डॉ. सीमा श्याम यांची कथा अतिशय आवडली.** ती मानवी स्वभावाच्या अनाकलनीय कंगोऱ्यांचे यथार्थ दर्शन घडवणारी आहे. दर अंकांत त्यांनी असेच दर्शन द्यावे.

**रघुवीर विष्णुपंत यांच्या ''आठवणी सुरेशभाऊंच्या'' खरोखरच हृद्य आहेत.** अशा व्यक्तिमत्त्वाच्या सहयोगामुळेच संस्था नावारूपास येतात. आदर्श ठरतात.

- **भास्कर नरहर** (पृ.४६), रत्नागिरी.



Marathe Pratishthan

लिहिताना दोघांनाही स्वत:च्या तक्रारी अधिक स्पष्ट झाल्या. सल्लागार दोघांशी एकएकट्याशी व दोघांशी एकत्र अनेकवेळा बोलल्या. त्यांच्या घरातील इतर माणसांशीसुद्धा बोलल्या. या सगळ्यातून सल्लागाराच्या समोर अनेक गोष्टी मांडल्या गेल्या.

प्रशिक्षण आणि अनुभवाने सल्लागार शब्दांपलिकडले जाणू शकतात. त्यांनी सीमा अजयला त्यांची समस्या समजावून सांगितली. समस्या निर्माण होण्याची पार्श्वभूमी समजावून दिली. विसंवाद टाळण्याचे शक्य ते उपाय सुचविले. त्यापैकी स्वत:ला सोपा वाटेल तो दोघांनी अनुसरावा असा सल्ला दिला.

सल्लाकेंद्रात आल्याचा फायदा असा झाला की सल्लागार दोघांपैकी कुणाचेही नातेवाईक नसल्यामुळे त्यांना मोकळेपणाने तक्रार मांडता आली. सल्लागाराने दोन्ही बाजू उलगडून दाखविल्यामुळे दुसऱ्याच्या अडचणी समजल्या. स्वत:च्या समस्येचे मूळ सापडले. त्यामुळे सुसंवादातला खरा अडसर समजला. सल्लाकेंद्रात उपदेशाचे डोस पाजत नाहीत. त्यामुळे आपला प्रश्न आपणच सोडवू शकतो हा आत्मविश्वास मिळतो.

नेहमी समस्या नुसत्या बोलून सुटण्याइतक्या साध्या नसतात. नवरा व्यसनी असतो, विवाहबाह्य संबंध असतात. फसवून लग्न केलेले असते. मालमत्तेच्या समस्या असतात. हुंड्याच्या समस्या आहेत. स्त्रियांचा कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ होतो. अनेक प्रश्न असतात. अशावेळी सल्लाकेंद्राची खूप मदत होते. व्यसनासारख्या समस्येसाठी नेमकी मदत कुठे मिळेल, ही माहिती मिळू शकते. काही वेळा मानसोपचारी गरज असते. समुपदेशक त्या व्यक्तीची उपचार घेण्यासाठी तयारी करतो.

अनेकदा वैवाहिक विसंवादाचे मूळ लैंगिक विसंवादात असते. अशा समस्या मुळात उमगत नाहीत. जाणवल्या तरी कोणी मान्य करीत नाहीत. मग वड्याचे तेल वांग्यावर या न्यायाने घरात धुसफूस सुरू होते. सल्लाकेंद्रात अशा समस्या सांगता येतात. समुपदेशकाच्या लक्षात येऊ शकतात. तज्ञांची मदत मिळू शकते.

सल्लाकेंद्रात जशी समस्या शास्त्रशुद्ध पद्धतीने सोडविली जाते. सर्व माहिती गोपनीय ठेवली जाते. समस्याग्रस्त व्यक्ती उदा. वैवाहिक समस्या असणारे दांपत्य दोघे मिळून जर सल्लाकेंद्रात गेले तर गोष्टी खरोखरच घरातल्या घरातच राहतील. नातेवाईकांत शेजाऱ्यांमध्ये होणारी चर्चा टाळता येईल.

समुपदेशन मानसोपचार याबद्दलचा पूर्वग्रह नाहीसा झाला तर समस्या उग्र रूप धारण करण्यापूर्वीच सोडविता येतील. आज जे घटस्फोटांचे वाढते प्रमाण बघतोय त्यातले बरेचसे घटस्फोट वेळेवर योग्य सल्ला मिळाल्यामुळे टाळता येतील.

***

---

# बोनस

- **विनायक केशव** (पृ.२०), वरळी, मुंबई

***''खरं सांगू? मला मुळी आरसाच दिसत नव्हता! मला दिसत होतीस तू. आरशापलीकडली तू!! सुख नुसतं मानण्यावर नसतं. पाहण्यावरसुद्धा असतं! खरं ना?''***

असं म्हणतात, म्हणजे हिंदी भाषेत म्हणतात, 'उप्परवाला छप्पर फाड के देता है।' आता तळमजल्यावर राहणारा मी. छप्पर फाडायला मी शेवटच्या मजल्यावर थोडाच रहात होतो. मला वाटतं उप्परवाल्याला माझी अडचण समजली असावी. म्हणून छप्पर फाडण्याऐवजी मोरीतल्या नळातून त्यांनी सोन्याच्या नाण्याऐवजी तेवढ्याच किमतीच्या जलधारा सोडल्या. आजुबाजुच्या खोल्यातून पाण्याचा दुष्काळ असताना आमच्या मोरीतला नळ भडाभडा वहात होता.

मी तर फारच गोंधळून गेलो. दिवसभराच्या धावपळीत देवाची सेवा सोडाच नुसतं नांव घेण्याला सुध्दा कधी वेळ मिळत नाही. देवांना ताम्हनात बुचकळून काढताना सौ.चं पोरांना दम मारण्याचं आणि मला टोमणे मारण्याचं पुण्यकर्म चालूच असतं. असली माफक आणि भेसळयुक्त भक्ती काय फळ देणार?

मला नसला तरी सौ. ला देवबाप्पा राजी असावा.

चार दिवसांनी उप्परवाल्यांनी चावी उलटी फिरवली. झालं. आमच्या नळाचं तोंड बंद पडलं. आम्ही इतरांच्या पंक्तीला जाऊन बसलो. झाल्या प्रकारांनी सौ. संतापली.

''तुम्ही म्युनिसिपालटीत नोकरी करता हे सांगताना मला शरमल्यासारखं होतं''

''का? मी चांगला कमिशनर साहेबांच्या कचेरीत काम करतो. झाडूखात्यातला झाडूवाला नाही, समजलीस!''

''अहो, त्याचा सुद्धा वशिला कुठेना कुठे तरी असतो.''

''म्हणजे तुझं म्हणणं तरी काय?''

''अहो, चार दिवस भसाभसा वाहणारा नळ कोरडा का पडला? केलीत चौकशी?''

''अग, मे महिना आहे. पाणी कमीच सोडणार.''

''मे महिना आमच्या घरात मग कोपऱ्यावरच्या रामभाऊंकडे काय श्रावण महिना आहे श्रावणसरी पडायला? असली फालतू कारणं सांगू नका. मला माहीत आहे खर कारण.''

''काय आहे खरं कारण?''

''अहो, तुमच्या परममित्र रामभाऊंनी पाणीखात्यात चक्क पैसे चोरले.''

''अगं हळू बोल. भिंतीला कान असतात.''

''असू देत. त्या मेल्या चावीवाल्यानी घोटाळा केला आणि भलतेच नळ बंद झाले चार दिवसापूर्वी. म्हणून आपल्या नळाला पाणी आलं, समजलं?''

''मी तुमच्या म्युनिसिपालटीत असते



Marathe Pratishthan

तर...''

''तर काय?''

''बंबवाल्याला सांगून त्याच्या होझ पाईपनी घरचं पाणी भरून घेतलं असतं. पाण्याचं जाऊ द्या. चाळीतल्या सगळ्यांना, कानिटकर आणि आपण सोडून सगळ्यांना बोनस मिळतो. कुठल्याशा कंपनीत दरवाजे बंद करणाऱ्या माणसालासुध्दा बोनस मिळतो. तो म्हणे इनकम टॅक्स सुद्धा भरतो. एवढच काय कानिटकरांची छबी गोखलीण बाईंना सांगत होती, त्यांनासुद्धा बोनस मिळणार आहे. आता बोनस म्हणून नव्हे तर दुसरं काहीतरी म्हणत होती. काही का असेना. बोंडल्यांनी पाजलं काय आणि चमच्यानी पाजलं काय दूध ते दूधच ना? कानिटकरसुद्धा तुमच्या म्युनिसिपालटीतच आहेत. त्यांनी व्यवस्थित घरात सांगितलं. तुम्ही बोललात का? बरं चेहऱ्यावरुन समजावं तर आकाश कोसळल्यासारखा चेहरा. एक रेष बदलेल तर शपथ.''

पाहिलत? हा हरामखोर कानिटकर. काही ना काही कारणांनी आमच्या घरात भांडण लावून देतो. एखाद्या सभासदानी पालिकेच्या सभेत सूचना केली तर तो सभागृहाचा निर्णय होत नाही एवढं समजण्याएवढीसुद्धा अक्कल या कानट्याला नाही.

पण चमत्कार घडला खरा. बोनस नाही पण सानुग्रह अनुदान मंजूर झालं. सौ. च्या भाषेत बोंडल्याऐवजी चमचा मिळाला.

त्या दिवशी ठेवणीतला कोट घालून मी ऑफिसमध्ये गेलो. घरी परतताना मध्येच कानिटकर भेटला. आता माझ्या खिशाला चाट बसणार हे नक्की.

''गजाभाऊ, अहो आज तरी चेहरा हसरा ठेवा. आमच्यासारखा मित्रानां खाऊ पिऊ घाला.''

''खाऊ पिऊ घाला? पैसे काय मला एकट्यालाच मिळालेत? कानिटकरा अरे एकदा तरी पैसे खर्च कर बाबा.''

''जाऊ द्या. खरं म्हणजे मीच तुम्हाला चर्चगेटच्या पुरोहिताकडे नेणार होतो. चांगला चांदीच्या ताटात जेवणाचा बेत होता. नंतर मस्तपैकी पान चघळत टॅक्सीने घरी गेलो असतो.''

''तुम्ही मला नेणार होतात! नेलं असतं. पण बील मलाच भरावं लागलं असतं.''

''बरं बाबा, निदान टॅक्सीने तरी येणार की नाही. पाहिजे तर टॅक्सीच्या भाड्याचे पैसे अगोदर देतो. मग तर झालं?''

हो ना करता प्रथमच मी टॅक्सी करून ऑफिसमधून घरी आलो. कानिटकर भाजी घ्यायचं निमित्त करून नाक्यावरच टॅक्सीतून पसार झाला. भाडं अर्थात मीच दिलं.

मी दारात पाऊल टाकण्या अगोदरच बातमी घरात पोचली होती. युद्ध जिंकून येणाऱ्या विजयी वीरासारखं माझं स्वागत झालं. खुर्चीत बसण्याअगोदरच सौ. नी मोठ्या प्रेमानी माझा कोट काढून आतल्या खोलीत नेला. माझा बोनस माझ्या नजरेसमोर अस्तंगत झाला.

घोटभर पाणी पिऊन मी खुर्चीत डोळे मिटून गतकाळात वावरू लागलो. तो माझा आवडता छंदच होता.

.......... मी सहा महिन्यांचा होतो तेव्हा बाबा अचानक गेले. आई माहेरची अनाथ मुलगी. दुसऱ्यांकडे स्वयंपाक करून, घरी शिवणकाम करून संसार रेटीत होती. नाक्यावरच्या परांजपे वकिलांकडे स्वयंपाकाचे काम करीत होती. एक दिवस शाळेत जाताना परांजपे वकिलांकडे आईला चावी देण्यासाठी गेलो. तो श्रावणी सोमवार होता. मला पाहून वकिलीण बाईंनी मला संध्याकाळी जेवणाला बोलावलं.

जेवताना माझं लक्ष समोर बसलेल्या परांजपे वकिलांकडे गेलं. गोऱ्यापान चेहऱ्यावर सोनेरी काडीचा चष्मा आणि गळ्यात सोन्याचा गोफ शोभून दिसत होता. जेवण आटोपल्यावर मी हॉलमध्ये एका कोपऱ्यात गुपचुप आईची वाट बघत बसलो होतो. जेवण आटोपून परांजपे वकील हॉलमध्ये आले. चष्मा काढून टेबलावर आरशासमोर ठेवला व ते पलिकडच्या खोलीत गेले.

मला मोह आवरला नाही. सोनेरी काडीच्या चष्म्यानी मला भुरळ घातली. आजूबाजूला बघत मी चष्मा डोक्यावर चढवला व आरशात निरखून पाहू लागलो. स्वत:वर खूष होऊन मी टेबलवरच्या कागदावर तेथे असलेल्या पेनने लिहिण्याची ॲक्टींग करू लागलो. मध्येच आरश्यात स्वत:ला पहात होतो.

एवढ्यात पाठून जोराची हांक ऐकू आली.

मी पाठी वळून पाहिलं.

संतापानी लाल झालेले डोळे गरागरा फिरवत परांजपे वकिलांनी माझ्याकडे झेप घेतली. माझ्या डोळ्यावरचा चष्मा ओरबाडून घेतला. माझ्या कानशिलांत जोरानी लगावून दिली.

## साक्ष

**- डॉ. सौ. सीमा श्याम** (पृ.४११), पुणे

खिडकीच्या चौकटीतून
डोकावणाऱ्या पालवीने
मलाही पल्लवीत केले
काळजाच्या जखमांतून
आनंदाश्रू झिरपू लागले
चौकटीतून दिसणाऱ्या
लखलखत्या ग्रहांनी
घनतिमिराला प्रकाशिले
संभ्रमातल्या नयनांना
पारदर्शी रूप दिले.
प्रवेशणाऱ्या मोहक वाऱ्याने
भुलविले वेड्या मनाला
हळुवार स्पर्शिले ह्या तनूला
आणि क्षणांत वळविले
या माझ्या भाग्याला.
लांबवर वाहाणाऱ्या
निळ्या शार आकाशांत
स्वैरपणे पोहू लागले
स्वातंत्र्याच्या जाणीवेने
निरभ्र निश्चित झाले.
हिरव्या पल्लवीने मला
न्याहाळले आत्मियतेने
संवादिले निशब्दतेने
ईश्वराच्या अस्तित्त्वाची
साक्ष दिली या प्रत्येकाने.



Marathe Pratishthan

''भिकारडं पोर. सोन्याचा चष्मा लावताय. तुझ्या बापानी तरी असा चष्मा लावला होता का?''

मी बेभान झालो.

''मी काही चोरत नव्हतो चष्मा. बापानी कशाला, मीच मोठा झाल्यावर अस्सा सोनेरी चष्मा लावून येईन तुमच्याकडे.''

''अरे जा रे, वारावर जेवणारं भिकारडं पोर. सोनेरी चष्म्याच्या गोष्टी बोलतय.''

का कोणास ठाऊक. आयुष्यात कधीतरी येणाऱ्या आनंदाच्या प्रसंगी माझ्या डोळ्यासमोर हा प्रसंग उभा राहतो आणि रंगाचा बेरंग होतो.

हा गुंता कायमचा सुटावा म्हणून मध्यंतरी मी सौ. जवळ सर्व प्रकार सांगितला.

''कमाल आहे. एवढी वर्ष हा अपमान कोंडून ठेवलात तुम्ही. मेल्या सोनेरी चष्म्याचं काय? माझ्या बांगड्यात भर टाकली त्याऐवजी चष्मा नसता का घेतला?''

''अग चष्मा म्हणजे दागिना नाही अंगावर घालायला. इतकी वर्ष चष्म्याची जरूरीच भासली नाही. परवाच डॉक्टर म्हणाले 'गजाभाऊ डोळे तपासून घ्या' डोळे तपासले. नंबरसुद्धा घेतला. तुला नाही का दिला ठेवायला. खरं सांगतो सवड झाली की सोनेरी अगदी अस्सल सोनेरी चष्मा मी घेणार. परांजपे वकिलांकडे जाणार आणि अगदी ठणकावून सांगणार ''परांजपे साहेब, बघा हे भिकारडं पोर सोन्याचा चष्मा स्वत: खरेदी करून तुम्हाला दाखवायला आलय.''

''आता काय उपयोग? परांजपे वकील गेल्या वर्षीच वारले.''

''नसतील, परांजपे वकील नसतील. पण त्यांच्या हॉलमधला माझा अपमान पाहून खिदीखिदी हसणारा आरसा आहे ना अजून.''

''आता काय उपयोग? परांजपे वकील गेल्या वर्षीच वारले.''

''नसतील, परांजपे वकील नसतील. पण त्यांच्या हॉलमधला माझा अपमान पाहून खिदीखिदी हसणारा आरसा आहे ना अजून?''

बनारसी शालूची हौस सौ. ला बरेच दिवस होती. 'गोखलीण बाईंचा शालू किती छान दिसतो नाही.' असे शेरे ती वारंवार मारीत होती.

बोनसची रक्कम मी पाहिलीसुद्धा नव्हती.

शेवटी दिवाळी फंडातून पैसे काढून मी गुपचुप एक सुंदरसा बनारसी शालू आणून हळूच पलंगावरच्या गादीखाली लपवून ठेवला.

जेवण आटोपल्यावर मी बेडरूममध्ये पलंगावर आडवं होण्याऐवजी वर्तमानपत्र वाचीत बसलो.

''हे काय? कसलं वाचन चाललयं? सकाळी झाला ना वाचून पेपर?''

''अग एक खास बातमी वाचायची राहिली सकाळी.''

''खास बातमी? रोजच्याच मारामारीच्या बातम्या होत्या पेपरमध्ये.''

''अग खास बातमी सांगायची ही जागा नाही.''

''कळलं. बोनस मिळाला म्हणून वय काही कमी होत नाही हो.''

''बोनस मला कागदोपत्री मिळाला. ताबा मात्र तुला मिळाला.''

मी बेडरूममध्ये पलंगावर जाऊन बसलो.

सौ. बातमी ऐकण्यासाठी पाठोपाठ आली. गादीखालचा शालू तिच्या हातात देत मी म्हटलं ''ही बर ती खास बातमी.''

सौ. च्या डोळ्यातून आसवं गळू लागली.

''अय्या बनारसी शालू? अगदी माझ्या स्वप्नातला शालू. खरं सांगू? हा शालू मला माझ्या लग्नात मिळाला असता तर! जाऊ द्या. शालू पांघरायचं वय आहे हो माझं अजून. बरं शालू गादीखालून काढताना आणखी काही वस्तू दिसली का?''

''काय दिसणार? गादीखाली पलंग. पलंगाखाली जमीन.''

''अगदी वेंधळे आहात तुम्ही. बघा पाहू पुन्हा.''

गादीखाली नवीन चष्म्याची केस होती.

''म्हणजे तू चष्मा ठेवताना शालू पाहिला होतास तर! मग शालू माझ्याकडून घेताना भुरळून जाण्याचं नाटक कशाला?''

''शालूच काय, साधं पातळ जरी मला दिलं असत तरी मी भुरळून गेले असते. मी शालू पाहिला आहे हे तुम्हाला सांगितलं असतं तर त्यातली मजाच निघून गेली असती. हो ना?''

चष्मा माझ्या डोळ्यावर चढवून माझ्यासमोर आरसा धरीत सौ. म्हणाली.

''खरचं किती छान दिसतो सोनेरी चष्मा तुमच्या गोऱ्यापान चेहऱ्याला.''

मी निरखून पाहू लागलो. एवढा वेळ कष्टाने आवरून ठेवलेले अश्रु ओघळू लागले. मला आरशात काहीच दिसेना. नंतर दिसू लागले लाल डोळे गरगर फिरवणारे परांजपे वकील. दिसत होते पदोपदी झालेले अपमान, अवहेलना, कुचेष्टा. पण हे सारं हळू हळू विरून गेले आणि दिसू लागली खरेदी करून आलेली बछडी. दिसू लागली अंगावर बनारसी शालू पांघरलेली सौ. खरच सर्व सुखं हात जोडून उभी होती.''

''कमाल आहे. एवढं काय निरखून बघायचं आरशात? रागावता काय? रडता काय? हरवता काय? काय, दिसत होतं काय आरशात?''

''खरं सांगू? मला मुळी आरसाच दिसत नव्हता! मला दिसत होतीस तू. आरशापलीकडली तू!! सुख नुसतं मानण्यावर नसतं. पाहण्यावरसुद्धा असतं! खरं ना?''

***

हसरे हितगुज

## 'घरची' आठवण

आपल्या खानावळीत येणाऱ्या मेंबर लोकांना जेवताना आपण जणू काही घरीच जेवत आहोत असे वाटावे म्हणून रामभाऊंनी खानावळीचे नाव 'घरची आठवण' असे ठेवून दणक्यात उद्घाटन केले.

चारच दिवसात भात कच्चा व पोळ्या करपलेल्या असतात अशा तक्रारी सुरू झाल्या तेव्हा रामभाऊंनी वैतागून उत्तर दिले ''अहो म्हणून तर खानावळीचे नाव 'घरची आठवण' ठेवले आहे! समजलं?''

**- विठ्ठल महादेव** (पृ.२३५),
विश्रामबाग, सांगली.



Marathe Pratishthan

# अंबेजोगाई यात्रीनिवास प्रकल्प

मराठवाडा भागातील श्री योगेश्वरी देवी, अंबेजोगाई ही महाराष्ट्रातील अनेक चित्तपावन कुटुंबियांची कुलस्वामिनी आहे. अलिकडे अंबेजोगाईला भेट देणाऱ्यांचे प्रमाण बरेच वाढत आहे. हे लक्षात घेऊन अंबेजोगाई येथे देवीच्या देवळाजवळ पश्चिमेला एक उत्कृष्ट दर्जाचे विश्रामधाम/यात्री निवास उभे करावयाचे ठरविण्यात आले. पुण्यातील दोन ज्येष्ठ उद्योजक मे. पु. ना. गाडगीळ (सराफ) फर्मचे श्री. दाजीसाहेब गाडगीळ व मे. चितळे बंधु मिठाईवालेचे श्री. रघुनाथराव (भाऊसाहेब) चितळे यांचे पुढाकाराने 'श्री अंबेजोगाई भक्त निवास न्यास, पुणे' नावाने सार्वजनिक न्यासाची स्थापना झाली आहे.

भक्त निवासाची वास्तु श्री योगेश्वरी मंदिराच्या पश्चिमेला मुकुंदराज समाधी रस्त्यास लागून चित्तपावन ब्राह्मण संघ, मुंबई (गिरगांव) यांच्या १००००चौरस फूट जागेवर बांधली जाणार आहे. प्रकल्प दोघांच्या संयुक्त विद्यमाने उभा राहणार आहे. संपूर्ण प्रकल्पाचा खर्च ६० ते ६५ लाख रुपयांपर्यंत होईल.

यासाठी भक्तजनांना देणग्यांचे आवाहन करण्यात आले आहे. (किमान रु. १०००) ड्राफ्ट 'श्री अंबेजोगाई भक्त निवास न्यास, पुणे' या नावाने अकौंट पेयी पाठवावा. ड्राफ्ट युनायटेड वेस्टर्न बँक, सदाशिव पेठ, पुणे ३०, सेव्हिंग बँक अकौंट नं. १६१९२ वर काढावा.

पत्ता : श्री अंबेजोगाई भक्त निवास न्यास, पुणे.
द्वारा श्रीपाद विनायक करमरकर,
ब्लॉक नं. ४, भार्गव चेंबर्स,
४९/१, पर्वती, पुणे - ४११ ००९.
फोन नं. (०२०) ४२२२६९८

***(चित्तपावन मासिक ५ नोव्हेंबर २००१ वरून)***

***

# २३ ठिपके २३ ओळी

**- सौ. मीना सदानंद** (पृ.४१७), बांद्रा, मुंबई

मी ''कालनिर्णय'' ची मागील पाने चाळण्यास सुरवात केली. पाककृती, व्यायाम, राशीभविष्य वगैरे वाचता वाचता माझी दृष्टी एका मथळ्यावर थबकली, **''तेवीस ठिपके तेवीस ओळी''**

मन एकदम सैरभैर झाले. माहेरच्या आठवणीने मी **तेवीस वर्षे** मागे गेले. चेंबूरला माझे माहेरघर. माझ्या माहेरघराचे नाव ''जानकी निवास''.

मी एकुलती एक. पण ''जानकी निवास'' मध्ये मी कधीच एकटी नव्हते. बंगल्यात तीन बिऱ्हाडे होती. त्यापैकी एक तेलगू भाषिक होते. त्यांच्या घरी ४ मुलगे व ३ मुली. त्यातील सर्वात धाकटी सुवर्णा माझ्याबरोबरीची होती. सुवर्णा माझी अगदी जिवलग मैत्रीण, तिला घरी चेल्ली म्हणत. चेल्ली म्हणजे तेलगू भाषेत धाकटी बहीण. चेल्ली माझी मैत्रीण, बहीण, मार्गदर्शक सर्वच होती. चेल्लीच्या घरी मला मोठी भावंडे मिळाली. दुसरे बिऱ्हाड म्हणजे पाठककाका, काकू, छोटी गोरीगोमटी वनिता व रांगणारा गिरीश, झाले मला धाकटी भावंडे मिळाली. पाठककाका व काकूंनी माझ्यावर खूप प्रेम केले. माझ्या आवडीचे पदार्थ बनविणे, तऱ्हेतऱ्हेच्या वेण्या घालणे, विणकाम, शिवणकामात मदत करणे हा आमच्या काकूंचा आवडता छंद!

आमच्या ''जानकी निवास'' मधील वातावरण अगदी एका कुटुंबाप्रमाणे होते. अगदी गुढीपाडव्यापासून होळीपौर्णिमेपर्यंतचे सर्व सण आम्ही एकत्र मिळून साजरे करीत असू. सर्वात दणक्यात साजरा होणारा सण म्हणजे दिवाळी.

आ हा हा! दिवाळीचा सण आमच्याकडे नरकचतुर्दशी पासून तुळशीविवाहापर्यंत साजरा होई. ''तुळशी विवाह'' अगदी साग्रसंगीत पद्धतीने केला जाई. वनिताच्या दारातील मांडवाखाली शुभविवाह, चेल्लीचा कृष्ण व माझी तुळस, वनिताच्या आजोबांचे यथासांग मंत्र व मंगलाष्टके. ऊसाचे दांडे, बोरे, आवळे, साखर फुटाणे, हळद, कुंकू, अक्षता, फुले अशा जय्यत तयारीनिशी नटूनथटून विवाह पार पडे. विवाहानंतरचे भोजन म्हणजे चेल्लीच्या घरची शेवयाची खीर, वनिताच्या घरच्या गरमागरम पुऱ्या, माझ्याकडचा वरण-भात-तूप व बटाट्याची भाजी असा खास बेत असे.

अरे हो, दिवाळीचे सांगायचे राहूनच गेले. सर्वांचा मिळून बंगल्यावर एक मोठा कंदील लावला जाई. कंदील बनविण्याचे काम चेल्लीचा भाऊ शास्त्री करीत असे. मी, चेल्ली, अनील, वनीता, गिरीश त्याला कागद कापण्यास मदत करीत असू. रंगीत कागद नक्षीदारपणे कापणे हे गिरीशचे काम सराईतपणे होत असे. तो चित्रकलेतही पारंगत होता. रात्रभर जागून कंदील पूर्ण करून रात्रीच तो टांगून ठेवायचा.

दिवाळीत संध्याकाळी अंगणात सर्वजणी मिळून रांगोळ्या काढण्याचा कार्यक्रम असे. माझे रांगोळीचे पुस्तक, सर्वांनी मिळून आणलेली रांगोळी, रंग, ठिपक्यांचा कागद, चकमक वगैरे सरंजाम घेऊन रांगोळी काढण्याचा कार्यक्रम सुरू होई. रोज नवी म्हणजे चार दिवस चार रांगोळ्या काढायचा असा आमचा प्रघात होता. प्रत्येक रांगोळी नीट राहण्यासाठी कडेने विटा लावून त्यावर पत्रा ठेवण्याचे काम मुले म्हणजे आमचे भाऊ करीत. दिवाळीचा शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीज. त्या दिवशी चौथी व सर्वात मोठी रांगोळी काढायची. सर्वात मोठी तर किती मोठी, तर..... ''तेवीस ठिपके तेवीस ओळी''ची रांगोळी!

मोठ्या एकाग्रतेने मन लावून आम्ही मुली ती रांगोळी काढत असू. सर्वांच्या घरी येणाऱ्या पाहुण्यांकडन आमचे व आमच्या रांगोळीचे कौतुक होई. भाऊबीजेची ओवाळणी आटोपली व जेवणे आटोपली की आम्ही सर्वजण परत अंगणात जमत असू. उरलेले फटाके उडविण्याचा

Marathe Pratishthan

कार्यक्रम असे. रात्रीचे साडेअकरा वाजले की चार दिवस जपलेल्या रांगोळ्यावर फटाके लावण्याचा शास्त्रीचा शिरस्ता होता. एका पाठोपाठ एक करीत शेवटच्या रांगोळीवर म्हणजे ''तेवीस ठिपक तेवीस ओळी'' वर मोठा ॲटमबॉम्ब लावला जाई. त्या आवाजाबरोबर आम्ही मुलेदेखील आनंदाने टाळ्या वाजवीत, जल्लोष करीत असू.

पण आज डोळे पाण्याने भरून आले आहेत. कारण आज सर्वजण आपापल्या मार्गाने दूर गेले आहेत. माझे लग्न होऊनही तेवीस वर्षे उलटली आहेत. आज ते अंगणही नाही व आज ते ''जानकी निवास''ही ''तेवीस ठिपके तेवीस ओळी'' प्रमाणे उध्वस्त झाले आहे. माझ्याजवळ उरल्या आहेत त्या फक्त आठवणी.

***

## त्रिदल (तीन)

महादेवाचे बिल्वपत्र त्रिदल
गजाननाचे दूर्वांकूर त्रिदल
तेरड्याचा रंग दिवस तीन
दत्ताच्या मुर्तीची मुखे तीन
हरिहरेश्वराचे नेत्र तीन
रंगमंचावरील नाटकाचे अंक तीन
त्रिकोणाच्या बाजू तीन
पळसाला पाने असंतात तीन
काम बिघडतं तेव्हा व्यक्ती तीन
चुलीचे दगड असतात तीन
भारताच्या ध्वजाचे रंग तीन
हितगुज करण्यासाठी जमतो आपण
आडनावाची अक्षरे सुध्दा तीन (मराठे)

- **स्वाती अभ्यंकर,** चिंचवड, पुणे
(विजय अनंत, पृ. १५५, यांची मुलगी)

## स्मरणातल्या कविता

१) पंकापोटी जन्म पावुनी सौंदर्या शोधते
म्हणुनि का कमळ तुच्छ ते?

२) सुरासुरांनी भांडण करुनी सागरास मंथिले
म्हणुनि का अमृत ते नासले?

३) असे कोळसा काळा, हीरक सांगे परि सोयर
म्हणुनि का धवल न कोहिनूर?

४) तडित कडाडे उपजे काळ्या कभिन्न मेघोदरी
म्हणुनि का वीज नसे साजिरी?

५) महाभयंकर असे विषारी नागाची ती फणी
म्हणुनि का गरलच वरचा मणी?

प्रेषक : **विजय अनंत** (पृ.१५५), पुणे

***

# विवाह सहाय्य

***हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी.***

***बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.***

***कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक***

**क्र. २९/२००२ वर** - अनिल गजानन फाटक, को.ब्रा., गोत्र-कौशिक, जन्म - ११.११.१९६९, उंची - ५'-१०'', B.Com., नोकरी - आर. एम. मोहिते स्पिनींग मिल, मासिक प्राप्ती रू. ३०००. आई-वडील आहेत. स्वत:चे घर कोल्हापूर येथे, एक बहीण विवाहित, भाऊ नाही, चष्मा नाही, मंगळ नाही. **संपर्क** - श्री. गजानन शंकर फाटक, ७९० वैभव, आय.टी.आयचे मागे, कोल्हापूर - ४१६००७. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३०/२००२ वर** - राघवेंद्र विष्णु थत्ते, को.ब्रा., गोत्र-शांडिल्य, जन्म- २८.५.१९७०, उंची - ५'-४'', B.Com., व्यवसाय मेडिकल स्टोअर, मासिक प्राप्ती रु. ७०००, आई-वडील आहेत, एक बहीण विवाहित, भाऊ नाही, वडिलांचे नावावर एक, मुलाचे नावावर एक घर. सांगली येथे फ्लॅट, तसेच कुंडल येथे घर. **अपेक्षा** - ब्राह्मण पोटशाखेतील D.Farm, B.Farm. **संपर्क** - श्री. विष्णु विनायक थत्ते, श्री मेडिकल स्टोअर, मु. पो. वायफळे, ता. तासगांव, जि. सांगली फोन : ०२३३-६७१११. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३१/२००२ वर** - प्रा. प्रसाद गोविंद रानडे, को.ब्रा., गोत्र-भारद्वाज, जन्म - १८.७.१९७५, उंची - ५'-७'', M.A. (Economics), व्यवसाय इचलकरंजी येथे प्रोफेसर, मा. प्रा. रु. ६०००, गोरापान, सशक्त, कराटे पटू, चष्मा नाही, सौम्य मंगळ, एक बहीण विवाहित, एक अविवाहित, भाऊ नाही, आई वडील आहेत, इचलकरंजी येथे चांगल्या वस्तीत १२०० चौ. फुटाचा दुमजली बंगला, आर्थिक स्थिती उत्तम. **अपेक्षा** - उंच, गोरी, पदवीधर, कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेची. **संपर्क** - श्री. गोविंद कृष्णाजी रानडे, ४/१२५ राधाकृष्ण निवास मंगलधाम, गणपती मंदिरा जवळ, इचलकरंजी, जि. कोल्हापूर ४१६११५, फोन : ०२३०-४२१८०० (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३२/२००२ वर** - श्री. महेंद्र नरहरी जोगळेकर, कोकणस्थ ब्राह्मण, गोत्र-अत्रि, जन्म- २२.८.१९७७, उंची - ५'-५'', B.Com., D.B.M., M.P.S.C. परीक्षा दिली आहे, खाजगी नोकरी, मा. प्रा. रु. ४००० ते ५०००, गोरा वर्ण, चष्मा नाही, मंगळ नाही, आई-वडील आहेत, भाऊ दोन अविवाहित, बहीण नाही, मुलाचे स्वत:चे टू रूम किचन घर. **अपेक्षा** - पदवीधर, एकत्र कुटुंबात राहणारी, नोकरीची अट नाही.

Marathe Pratishthan

**संपर्क** - श्री. एन. एम. जोगळेकर, सिद्धीविनायक नगरी, गोदावरी बी-२, अप्पुघराजवळ, निगडी, जि. पुणे फोन : ०२०-७६४०५४६. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३३/२००२ वर** - नारायण केशव आपटे, को.ब्रा., गोत्र-कौशीक, जन्म - २.६.१९७४, उंची ५'-८'', गोरा, सुदृढ, एम.कॉम, स्वत:च्या मालकीचे स्टेशनरी दुकान, मा. प्रा. रु. ५०००, वडील निवृत्त प्राध्यापक, आई आहे, १ भाऊ विवाहित, १ बहीण विवाहित, तीन खोल्यांचा फ्लॅट. **अपेक्षा** - घरकाम येणारी, दिसण्यास चांगली. **संपर्क** - श्री. के. वा. आपटे, यजुर्वेद अपार्टमेंट, एस. टी. कॉलनी रोड, विश्रामबाग, सांगली, फोन : ३०१६९९, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३४/२००२ वर** - अभिजीत मोहन साठे, को.ब्रा., गोत्र-वशीष्ठ, उंची - ५'-१'', जन्म - १४.५.१९७६, गौरवर्ण, चष्मा आहे, D.M.E., मा. प्रा. रु. ४५००, ३ बहिणी विवाहित, भाऊ नाही, सांगली पेठ भाग येथे वडीलार्जित घर, गांव भाग येथे २ रुम किचनचा फ्लॅट, ताबा डिसेंबर २००२ मध्ये. **अपेक्षा** - गौरवर्ण, पदवीधर, गृहकृत्यदक्ष. **संपर्क** - श्री. मोहन नारायण साठे, घर नं. २ पेठ भाग, श्री गणपती देवालयाजवळ, सांगली, फोन : ३७२९०२ (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३५/२००२ वर** - संदीप भास्कर काळे, को.ब्रा., गोत्र-वत्स, जन्म - २१.४.१९७५, उंची - ५'-१०'', चष्मा नाही, मंगळ नाही, बी.कॉम., कॉम्प्युटर डिप्लोमा, नोकरी उगार शुगर वर्क्समध्ये, पगार रु. ८०००, आई आहे, वडील आहेत, १ बहीण विवाहित, भाऊ नाही, स्वत:चा बंगला, फ्लॅट, घराचे भाडे, सुस्थिती, स्वत:चे स्टेशनरी चे दुकान. **अपेक्षा** - ग्रॅज्युएट, उंच, सडपातळ, नोकरी असल्यास प्राधान्य. **संपर्क** - श्री. भास्कर गणेश काळे, पारीजात बंगला, गुलमोहर कॉलनी, मालू हायस्कुल समोर, द. शिवाजी नगर, सांगली ४१६४१६, फोन : ३२२४१०, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३६/२००२ वधू** - कु. राजलक्ष्मी धनंजय देवल, को.ब्रा., गोत्र-कौशिक, जन्म - १८.४.१९८०, उंची - ५'-१'', B.E. (Electronics), वर्ण निमगोरा, चष्मा नाही, मंगळ नाही, आई वडील आहेत, शेती व डिपार्टमेंटल स्टोअर. **अपेक्षा** - शक्यतो इंजिनिअर, निर्व्यसनी, सुसंस्कृत घराणे. **संपर्क** - श्री. धनंजय देवल, देवल सुपर बझार, डी.एस.पी. ऑफिस समोर, विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५, फोन : ३००१०९, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

## गीतरामायण एक्स्प्रेस

मुंबई ते कलकत्ता दरम्यान गीतांजली एक्स्प्रेस धावते. हे नामकरण रवींद्रनाथ टागोरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ केले आहे. ग. दि. माडगूळकर आणि सुधीर फडके यांच्या प्रतिभेतून आकाशवाणीवर अजरामर झालेले गीतरामायण महाराष्ट्रातच नव्हे तर जेथे जेथे मराठी भाषिक राहतात तिथपर्यंत घरोघरी पोचले आहे. त्याची इतर भाषांतही भाषांतरे झाली आहेत.

मुंबई-पुणे दरम्यान धावणाऱ्या एखाद्या रेलगाडीस गीतरामायण एक्स्प्रेस हे नाव द्यावे. त्यामुळे गदिमांच्या या अजोड काव्याची स्मृती कायम राहील.

मराठी खासदारांनी याबाबतीत रेल्वेमंत्र्यांकडे पाठपुरावा करावा.

**- गजानन भास्कर**, (पृ. ४२७), घाटकोपर, मुंबई.

**क्र. ३७/२००२ वधू** - डॉ. कु. सरिता सुधीर कानडे, दे.ब्रा., गोत्र-वशिष्ठ, जन्म - २२.५.१९७८, उंची ५'-७'', वर्ण गोरा, लेन्स वापरते, मंगळ नाही, B.H.M.S., खाजगी हॉस्पिटलमध्ये मेडिकल ऑफिसर, मा. प्रा. रु. ५०००, आई वडील आहेत, एक भाऊ अविवाहित, पुण्यात पटवर्धन बागेत फ्लॅट. **अपेक्षा** - इंजिनियर, डॉक्टर, मनमिळाऊ, उंची - ५'-१०'' ते ६'-०''. **संपर्क** - श्री. शरद गोपाळ कानडे, फ्लॅट नं. १, कीर्ती कॉम्प्लेक्स, गणेश मंदिराजवळ, विश्रामबाग, सांगली ४१६४१५, फोन : ०२३३-३०३१००, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३८/२००२ वधू** - कु. शिल्पा नरसिंह कुलकर्णी, दे.ब्रा., गोत्र-भारद्वाज, जन्म - १२.२.१९७९, उंची ५'-४'', D.T.M. (Textile Engg.) मा. प्रा. - रु. ३०००, आई वडील आहेत, भाऊ एक अविवाहित, दोन बहिणी अविवाहित, सांगली मध्ये चार खोल्यांचा फ्लॅट. **अपेक्षा** - इंजिनियर, बँक ऑफिसर. **संपर्क** - श्री. नरसिंह बळवंत कुलकर्णी, प्रणव अपार्टमेंट, मंगलमूर्ती कॉलनी, द. शिवाजी नगर, सांगली, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ३९/२००२ वधू** - कु. शलाका शरद हरिदास, दे.ब्रा., गोत्र-काश्यप, जन्म - १७.३.१९७९, उंची ५'-३'', गौर वर्ण, चष्मा नाही, मंगळ नाही, B.E. (Civil), खाजगी नोकरी, मा. प्रा. - रु. ३०००, आई वडील आहेत, स्वत:चा कराड येथे बंगला, भाऊ एक अविवाहित, बहीण एक अविवाहित. **अपेक्षा** - इंजिनियर, चांगली नोकरी. **संपर्क** - श्री. शरद गोविंद हरिदास, क्षितीज, १७२ गजानन हौ. सोसायटी (पूर्व), स्टेशन रोड, कराड, जि. सातारा, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ४०/२००२ वर** - राजेश नारायण कट्टी, दे.ब्रा., वैष्णव, गोत्र-वशिष्ट, जन्म - १४.५.१९७५, उंची - ५'-६ १/२'', गोरा, चष्मा नाही, मंगळ नाही, Bsc. M.C.A., Senior Web Devloper, मा. प्रा. रु. १८०००, आई वडील आहेत, वडील SBI मधून चीफ मॅनेजर पदावरून निवृत्त, सांगली येथे बंगला, पुण्यात फ्लॅटचा ताबा नोव्हेंबर २००२ मध्ये मिळणार. **अपेक्षा** - गोरी, उंची - ५'-२'' ते ५'-४'', चष्मा नको, ग्रॅज्युएट. **संपर्क** - श्री. एन. आर. कट्टी, ४ मनीषा, स्टेट बँक कॉलनी, गुडस शेड जवळ, सांगली ४१६ ४१६, फोन : ३२५३७३, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ४१/२००२ वर** - प्रा. बलवंत जेऊरकर, दे.ब्रा., जन्म - २८.२.१९७५,

Marathe Pratishthan

उंची - ५'-४'', M.A., Mphil.set, सध्या phd चालू आहे, विलींग्डन महाविद्यालयात हिंदीचा पूर्ण वेळ प्राध्यापक, मा. प्रा. रु. १२०००, आई वडील आहेत, १ भाऊ व १ बहीण विवाहित. **अपेक्षा** - उच्च शिक्षित, रसिक, नोकरी असल्यास उत्तम. **संपर्क** - श्री. वसंतराव जेऊरकर, गोपाळ सदनिका, खरे मंगल कार्यालयाजवळ, विश्रामबाग, सांगली, ४१६ ४१६, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ४२/२००२ वर** - श्री. योगेश लक्ष्मण राजहंस, दे.ब्रा., गोत्र-गौतम, जन्म - २७.४.१९७८, उंची - ५'-९'', गहूवर्ण, बी.कॉम., मिरज एम.आय.डी.सी. मध्ये यीस्ट तयार करण्याचा स्वत:चा कारखाना, मा. प्रा. रु. ७०००, स्वत:चा बंगला, आई आहे, वडील नाहीत, १ बहीण विवाहित, भाऊ नाही. **अपेक्षा** - पदवीधर, गृहकृत्यदक्ष. **संपर्क** - श्री. योगेश राजहंस, योगेश बंगला, सह्याद्रीनगर, विश्रामबाग, सांगली, फोन : ३२१४१५, (म.प्र. वधूवर माहिती केंद्र सांगली यांचेकडून.)

**क्र. ४३/२००२ वर** - शैलेश भालचंद्र बुरसे, जन्म - ३०.१०.१९६५, देशस्थ ऋग्वेदी, गोत्र भारद्वाज, उंची - ५'-९'', मध्यम बांधा, गोरा, रक्तगट O +ve. DME. जेजुरीला MIDC मधे फॅब्रीकेशनचा स्वतंत्र व्यवसाय. १० हजार मासिक उत्पन्न. आईवडील डोंबिवलीला, मुलगा एकटाच पुण्यात - मुलाचा स्वत:चा फ्लॅट. १ मोठा भाऊ व २ बहिणी विवाहित आहेत. भाऊ बंगलोरला असतो. मुलावर घरची कोणतीही जबाबदारी नाही. मुलगा चांगाला खेळाडू असून तबलाही उत्तम वाजवतो. **अपेक्षा** - पदवीधर, नोकरी करणारी, दिसायला सुंदर, स्मार्ट, पत्रिका पहायची आहे. **संपर्क** - बहिणीचा पत्ता - डॉ. सौ. मानसी राजहंस, ८, कांचन अपार्टमेंट, १९ गिरिजा सोसायटी, MIT कॉलेज रोज, कोथरुड, पुणे ३८. फोन - ५४६९५७७. (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

**क्र. ४४/२००२ वर** - विनायक कमलाकर भंडारे, जन्म - १४.११.१९६५, गोत्र कृष्णाजय, देशस्थ यजुर्वेदी, S.S.C. फुलांचा स्वतंत्र व्यवसाय व नर्सरीमधे नोकरी. उत्पन्न १० ते १२ हजार. उंची - ५'-४'', मध्यम बांधा, गोरा, मुलाला आईवडील, १ विवाहित बहीण व २ लहान भाऊ आहेत. **अपेक्षा** - स्मार्ट, मनमिळावू, कमी शिकलेली चालेल पण व्यवसायात मदत करणारी पाहिजे. **संपर्क** - सौ. विजयालक्ष्मी कमलाकर भंडारे, ३६४ नवी पेठ, कुंभार मोटार स्कूल समोर, गांजवे चौक, पुणे ३०.(सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

## फ्रिजमुळे विषबाधा

सर्वसाधारण अशी समजूत आहे की, फ्रिजमध्ये ठेवलेलं अन्न बराच काळ तसंच सुरक्षित राहतं. खराब, दुषित होत नाही. पण नवीन संशोधनानुसार, फ्रिजमध्ये दीर्घकाळ ठेवलेल्या अन्न/खाद्यपदार्थामुळेच विषबाधेचे अनेक प्रकार घडू शकतात. **फ्रिजमध्ये ठेवलेल्या खाद्यान्न पदार्थांत** लिस्टिरिया, आरासिनिया, एन्ट्रोकोलोलिका, साल्मोनेला, क्रिप्टो स्पोरिडियम सारखे **अनेक बॅक्टेरियाज, व्हायरस आणि प्रोटोजोव्हा निर्माण होतात; विषबाधेला ते कारणीभूत ठरू शकतात.** अलीकडेच केलेल्या एका सर्वेक्षणांचं अनुमान आहे की, अमेरिकेत ६३ टक्के फूड पॉयझनिंग फ्रिजमधील साठवलेल्या खाद्यान्नाच्या सेवनामुळं होतं.

फूड पॉयझनिंग किंवा विषबाधेची लक्षणं तात्काळ दिसून येत नाहीत. सहा तासांनंतर दिसू लागतात. शरीरात सांधेदुखी, अखडणं, जुलाब, उलट्या, सतत डोकं दुखणं इत्यादी लक्षणं दिसू लागतात. वेळेवर उपचारासाठी डॉक्टरकडे धाव घेणं महत्त्वाचं असतं. स्वत: घरीच कोणीतरी सांगितलेले उपाय या वेळी करणं धोक्याचं असतं.

**- प्रेषक प्रमोद कृष्ण** (पृ.३७६), ठाणे

**क्र. ४५/२००२ वर** - रोहन प्रमोद मराठे, कोब्रा, कपिगोत्र जन्म - २०.०२.१९७६, रक्तगट A +ve, उंची - ५'-६'', गोरा, मध्यम बांधा. कॉंटॅक्ट लेन्स वापरतो. B.E. Printing, माणिकचंद नंदादीप प्रिंटींग प्रेसमधे सुपरवायझर. वडीलांच्या प्रिंटींगच्या व्यवसायात मदत करतो. मासिक उत्पन्न १० ते १२ हजार. मुलाला आजी, आई, वडील व १ लहान भाऊ आहे. वडलांचा स्वतंत्र व्यवसाय, आई KEM हॉस्पिटलमधे, भाऊ B.E. असून बंगलोरला नोकरी आहे. पुण्यात स्वत:चा फ्लॅट आहे. मुलगा सुगम संगीत उत्तम गातो. **अपेक्षा** - पदवीधर, नोकरी करणारी, कोणत्याही ब्राह्मण शाखेची, संगीताची आवड असणारी. **संपर्क** - श्री. प्रमोद विष्णू मराठे, ३१, आदित्य, ५०१ रास्ता पेठ, पुणे ४११०११. फोन ६१२८०९३. (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

**क्र. ४६/२००२ वर** - अजीत यशवंत मांडके, जन्म - ३१.०१.१९७२, देशस्थ ऋग्वेदी, B.Com., स्वतंत्र व्यवसाय, १२ हजार मासिक उत्पन्न, उंची - ५'-४'', सडपातळ, निमगोरा, मुलगा एकुलता एक असून त्याला फक्त आईवडील आहेत. **अपेक्षा** - पदवीधर, व्यवसायाची आवड असलेली, घरात व व्यवसायात मदत करणारी. **संपर्क** - श्री. यशवंत विश्वनाथ मांडके, २७ बुधवार पेठ, सुधारित सोसायटी, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११००२. फोन - ४४५९३८५ (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

**क्र. ४७/२००२ वर** - श्री. योगेश दत्तात्रय देशपांडे, जन्म - ८.१०.१९६७, उंची - ५'-६'', देशस्थ, B.Com. अपूर्ण (१ विषय राहिला आहे) ICI कंपनी वाघोली येथे मार्केटिंग मॅनेजर. ७ ते ८ हजार मासिक उत्पन्न. सावळा रंग, मुलाला आई वडील व २ विवाहित बहिणी आहेत. मुलावर कोणतीही जबाबदारी नाही. **संपर्क** - श्री. दत्तात्रय देशपांडे, १५ बी राहुल कुंज, ६१/अे, रामबाग कॉलनी, चैतन्य हेल्थ क्लब जवळ, पौड रोड, कोथरुड, पुणे ४११०३८. फोन - ५४३४२९६. (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)



Marathe Pratishthan

**क्र. ४८/२००२ वर** - धनंजय सुधाकर मराठे, जन्म - ८.१.१९७८, उंची - ५'-४'', कपीगोत्र, कोब्रा, B.Com., M.P.M. व संगीत अलंकार. एका शाळेत संगीत शिक्षक व कॉम्प्युटर शिक्षक. गाण्याचे स्वतंत्रपणे क्लास घेतो, मा. प्रा. ६००० रु., सावळा, चष्मा आहे. मुलाला आई, वडील व २ विवाहित भाऊ आहेत. वारजे येथे स्वत:चे घर असून प्रत्येकाला फ्लॅट आहे. **अपेक्षा** - नोकरी करणारी, कोणत्याही ब्राह्मण शाखेची व संगीताची आवड असणारी. **संपर्क** - डॉ. सुधाकर जनार्दन मराठे, ३६४/५ स्वेच्छापूर्ती, सिद्धकला हौसिंग सोसायटी, बायफ कॉलेज मागे, वारजे, पुणे ४११ ०५२ फोन - ५२३०२१९, ५२३३७१७ (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

**क्र. ४९/२००२ वर** - मोरेश्वर चिंतामणी मराठे, जन्म - २४.१०.१९७५, कोब्रा, कपिगोत्र, DME व Industrial Management कोर्स पूर्ण, Skantech Lasen Machines Pvt. Ltd. मुंबई येथे नोकरी, ७५०० रु. पगार, निमगोरा, उंची - ६', मध्यम बांधा, मुलाला आई (निवृत्त शिक्षिका), १ विवाहित भाऊ (शेजारच्या फ्लॅटमध्ये राहतो) व १ विवाहित बहीण आहे, मुलावर कोणतीही जबाबदारी नाही. स्वत:चा फ्लॅट आहे. **अपेक्षा** - कोकणस्थच, पत्रिका पहायची आहे. नोकरीची अट नाही, घरकाम सर्व व्यवस्थित करणारी व धार्मिक कार्याची आवड असणारी असावी. **संपर्क** - श्रीमती सुमती चिंतामणी मराठे, मानपाडा रोड, शंखेश्वर नगर, बिल्डींग नं A-४, फ्लॅट नं. २०४, आनंद केमिकल जवळ, डोंबिवली पूर्व ४२१ २०१. फोन - ८७००६६. (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

**क्र. ५०/२००२ वर** - शरद सुधाकर चिमणपुरे, जन्म - ०१.०७.१९७२, उंची - ५'-९'', देशस्थ यजुर्वेदी, गोत्र - गार्गेय, B. E. Electrical. पुण्यातील Baltec Systems Pvt. Ltd. या कंपनीमध्ये असिस्टंट मॅनेजर, १७००० रु. पगार, गोरा, मध्यम बांधा, रक्तगट ARh +ve, मुलाला आई, वडील व एक लहान भाऊ असून सर्वजण खामगांवला असतात, खामगांवला स्वत:चा बंगला, पुण्यामध्ये स्वत:चे घर व कार आहे. १ विवाहित बहीण. **अपेक्षा** - B.E., MBA, MSC, MCS, उच्चशिक्षित, दिसायला सुरेख, सुसंस्कृत घराण्यातील. **संपर्क** - श्री. सुधाकर ज. चिमणपुरे, 'यश', शुक्ला ले आऊट, नांदुरा रोड, खामगांव ४४४३०३, जि. बुलढाणा, मुलाचा पुण्यातील मोबाईल ९८२२४०७११६. (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

## अल्बर्ट आईनस्टाईनचा पत्ता

एकदा प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीच्या डीनच्या कार्यालयातील दूरध्वनी खणाणू लागला. डीननी रिसीव्हर कानाला लावताच पलिकडून विचारणा झाली, ''हॅलो, मला अल्बर्ट आइन्स्टाईन यांच्या घराचा पत्ता मिळेल का?''

अल्बर्ट आइन्स्टाईनना घरी व कार्यालयात भेटावयास येणारांची संख्या खूपच असे. त्यामुळे स्वत: आइन्स्टाईनने त्यांना सांगितले होते, की शक्यतो माझा घरचा पत्ता कोणालाही देऊ नये. त्यामुळे डीन 'सॉरी' म्हणून दूरध्वनी खाली ठेवण्याच्या विचारात होते; तेवढ्यात पलिकडून पुन्हा आवाज आला,

''हॅलो, मी स्वत: अल्बर्ट आइन्स्टाईनच बोलतोय. मी घराकडे चाललो आहे. परंतु घराचा नेमका पत्ता मी विसरलो आहे. तेव्हा कृपया, मला माझ्या घराचा पत्ता सांगा.''

आता हे वाक्य ऐकल्यावर मात्र डीननी कपाळालाच हात लावला.

- **प्रेषक प्रमोद कृष्ण** (पृ.३७६), ठाणे

**क्र. ५१/२००२ वर** - अशुतोष कुमार पंत, जन्म - २४.४.१९७६, उंची - ५'-६'', देशस्थ यजुर्वेदी, गोत्र - सावर्णिस, B.Com., B.A. संस्कृत चालू, कॉम्प्युटर व्यवसाय, २० हजार उत्पन्न, गोरा, देखणा, मध्यम बांधा, रक्तगट ARh +ve, मुलाला आईवडील व १ लहान भाऊ शिकत आहे. **अपेक्षा** - पदवीधर, गोरी, कोणतीही ब्राह्मण पोटशाखा, नोकरी असेल तर उत्तम, पत्रिका पहायची आहे. **संपर्क** - श्री. कुमार माधवराव पंत, ५८ नारायण पेठ, अष्टभुजा देवीजवळ, पंतांचा वाडा, पुणे ३०, फोन - ४४५७४५५. (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

**क्र. ५२/२००२ वर** - समीर श्रीकृष्ण काळे, जन्म - २.६.१९७८, उंची - ५'-५'', देशस्थ ऋग्वेदी, गौतम गोत्र, १०वी पास, व वायरमनचा कोर्स पूर्ण, Exside battery चिंचवड येथे नोकरी, ७००० रु. पगार, मुलाच्या अंगावर कोड आहे, मुलाला आई, १ विवाहीत भाऊ व १ अविवाहित भाऊ आहे, सर्वजण एकत्र राहतात. **अपेक्षा** - कोणत्याही ब्राह्मण शाखेची, पत्रिका पहायची आहे, एकत्र कुटुंबात मिळून मिसळून राहणारी, नोकरीची अट नाही. **संपर्क** - श्रीमती सरोज श्रीकृष्ण काळे, सुखवानी आंचल अपार्टमेंट, दळवी नगर, फ्लॅट नं. २२, दुसरा मजला, चिंचवड, पुणे ३३. (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

**क्र. ५३/२००२ वर** - अभिजित शशीकांत राजवाडे, जन्म - ६.३.१९७५, उंची - ५'-७'', कोब्रा, मेकॅनिकल इंजिनिअर, कॅलिफोर्निया येथून M.S. केले आहे, नोकरी अमेरिकेत आहे, ५५०० डॉलर मासिक उत्पन्न, मुलाला आई, वडील व १ विवाहित बहीण आहे. कर्वे रोड वर स्वत:चा बैठा बंगला आहे, आर्थिक स्थिती उत्तम आहे. **अपेक्षा** - इंजिनिअर किंवा डबल ग्रॅज्युएट मुलगी असावी, कोकणस्थ, गोरी, नोकरीची अट नाही. **संपर्क** - श्री. शशीकांत राजवाडे, ३३/३४ अ, एरंडवणे, मकरंद भाटे पथ, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४, फोन - ५४३७३४८. (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

**क्र. ५४/२००२ वर** - बिपीन भास्कर सोनसळे, जन्म - १२.२.१९७५, उंची - ५'-६'', देशस्थ यजुर्वेदी, शांडिल्य गोत्र, रक्तगट



Marathe Pratishthan

O +ve, डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक ॲण्ड रेडिओ इंजि., पुण्यामध्ये Magnaflux Systems Pvt. Ltd. येथे मार्केटिंग मॅनेजर, १८००० रु. मासिक उत्पन्न, मुलाला आई, वडील व १ लहान बहीण आहे. **अपेक्षा** - नोकरी करणारी, उंची ५'-२'' पेक्षा जास्त. **संपर्क** - श्री. भास्कर श्री. सोनसळे, ४ तेजस सोसायटी, कोथरुड, पुणे ४११०३८, फोन - ५३८२६६६. (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

**क्र. ५५/२००२ वर** - मंदार विजय दातार, जन्म - १.४.१९७६, उंची - ५'-६'', कोब्रा, वासिष्ठ गोत्र, गहू वर्ण, मध्यम बांधा, B.Sc. Maths, शालेय वह्या उत्पादन व विक्रीचा स्वतंत्र व्यवसाय, ७००० मासिक उत्पन्न. मुलाला आई व १ लहान भाऊ असून तो नोकरी करतो, मुलाला खगोलशास्त्र व ज्योतिषाची आवड आहे. **अपेक्षा** - कोकणस्थ, पदवीधर, पत्रिका पहायची आहे. **संपर्क** - श्रीमती चित्रा विजय दातार, २६ शुक्रवार पेठ, भाऊ महाराज बोळात, चिंचेच्या तालमीजवळ, पुणे ४११००२. फोन - ४४६०९१४. (सौ. नीलांबरी रमेश, म.प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत.)

***

# दिवस असे भाग्याचे

**- विनायक केशव** (पृ.२०), वरळी, मुंबई

भारतीय असंतोषाचे जनक अस्तंगत होऊन १० वर्ष उलटून गेली होती. पण असंतोषाचं अग्नीकुंड अग्नीज्वाळानी उफाळत होतं. खऱ्या अर्थानी ते मंतरलेले दिवस होते. मुक्त हस्तानी उधळलेली अक्षरं ठिणग्या होऊन असंतोषाचं अग्नीकुंड फुलवीत होती. कानेटकरांच्या भाषेत गवताची पाती शस्त्राची पाती बनली होती. सामान्य समजली जाणारी माणसं असामान्य बोलत होती, वागत होती. सारच काही अद्‌भुत होतं.

या पार्श्वभूमीवर भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी या अग्निकुंडाच्या वेदीवर प्राणाहुती दिल्या होत्या. सारा भारत दु:खसागरात बुडून गेला होता. मुंबई त्याला अपवाद नव्हती. एक जीवघेणी शांतता मुंबईला गिळून टाकीत होती. देवळातल्या घंटा नाद विसरल्या होत्या. घराघरातल्या चुली थंड पडल्या होत्या. या शूर हुतात्म्यावर अग्निसंस्कार केल्यानंतर सारं गिरगांव जणू आप्तेष्टाला अग्नी द्यावा तसं समुद्रस्नानासाठी चौपाटीवर जमलं होतं. एवढा प्रचंड समुदाय पण स्मशानशांतता. राग, द्वेष, संताप या पलिकडे लोकांच्या भावना पोचल्या होत्या.

मी त्यावेळी लहान होतो. पण घरातल कोणीच बोलत नाही हे मला जाणवत होतं. मोठेपणी एकदा आईची जपाची माळ मिळत नव्हती म्हणून आम्ही तिच्या काळ्या ट्रंकेची पाहणी करीत होतो. तळाशी एक बराच जुनाट हिरवा कागद सांपडला. कुणा कवीने हुतात्मा भगतसिंगवर केलेली कविता होती. मी उत्सुकतेनी कविता वाचली. कागद उलटून पाहिला चाळीतल्या वाचकांची नावं आणि रकमांचे आकडे टाकलेले होते. माझी उत्सुकता वाढली.

मी आईला कागद दाखवला. आईने रुद्रावतार धारण केला.

''काय थापा मारतोस बाबल? जपाची माळ ट्रंकेच्या तळाशी कुठे मिळणार? मला माहीत आहे तुम्हाला माझी ट्रंक तपासायची होती. काय मिळालं रे त्यात? जीवापाड जपलेला कागद मला न विचारता तू कशाला घेतलास? अरे पोलीस केव्हा धाड घालतील याचा नेम नाही. त्यावेळी चोरून छापलेली ती कविता होती. समजलास?''

मला हसू आवरेना. सगळे धंदे सोडून मुंबईचे पोलीस या बाईची ट्रंक कशाला तपासतील?

''बरं बाई माझं चुकलं, पण आई या कागदाच्या पाठीमागे आपल्या चाळीतील जुन्या बायकांची नांवे आणि त्यांच्यासमोर पैसे कसले लिहिले आहेत? हळदीकुंकू समारंभाचे की काय?''

''अरे, हळू बोल, तुला अजून काहीच अक्कल नाही रे.''

पोलीसांचं भूत आईच्या मानेवरून अजून उतरलं नव्हतं. ती आजूबाजूला बघत दबक्या आवाजात खुलासा करीत होती.

''अरे बाबल, कॉंग्रेसच्या स्वयंसेवकानी या कविता छापलेल्या कागदाचा गठ्ठा आमच्या चाळीत आणला. आम्ही घराघरातून कागद वाटले. संध्याकाळी समोरच्या विठोबाच्या देवळात प्रवचनासाठी आम्ही जमत असू. तेव्हा आम्ही ठरवलं की पुरुषमाणसाना न कळवता आम्ही चार पैसे बाजूला ठेवतो त्यातून वर्गणी काढायची आणि हुतात्मा फंडासाठी कॉंग्रेसच्या स्वाधीन करायची. आमच्या चाळीची वर्गणी मी जमवली त्याचा तो हिशेब हो.''

''पण एवढ्या कडीकुलपात का? त्यावर फंडाच नांव थोडच आहे? आणि आई, हे शेवटचं नांव 'काशीबाई' कोणत्या बाईचं? मला आठवत नाही अशी बाई''

''आठवत नाही काय? आपल्या प्रत्येकाकडे शेणाचा गोळा टाकणारी काशी. अरे तुझा गालगुच्चा घेऊन रडवणारी काशी. आलं का लक्षात?''

''बापरे, तिनंसुध्दा पांच रुपये दिले? कशाला त्या गरीब बाईकडून घेतलेत?''

''आम्ही कशाला घेऊ? मुळीच ती ऐकेना. म्हणाली 'त्या तरण्याबांड जवानानी देशासाठी प्राण दिले. मी वांझोटी, मला पोरबाळ असतं तर पाठवलं असतं कॉंग्रेसमध्ये, निदान मला वर्गणी तरी देऊ दे.' शेवटी बाबा मी तिचे पांच रुपये भरले. पण ती वस्ताद, तिला आपल्याकडून महिन्याला शेण टाकण्याबद्दल चार आणे मिळत असत. पांच रुपये फिटेपर्यंत तिन शेणाचे पैसे घेतले नाहीत. बोल आहे की नाही बाई वस्ताद''

काशीच काय अशा शेकडो सामान्य माणसानी आपआपल्या परीने हे अग्नीकुंड प्रज्वलित ठेवलं होतं.

कुठे गेली ही माणसं?

***

Marathi Pratishthan

## या अंकात


१. **तरुणांसाठी एक नवा उपक्रम - आंबा विक्री**....... पृ.१
काशिनाथ उर्फ प्रकाश श्रीधर, मुंबई

२. **जाहीर निमंत्रण : वर्धापन दिन समारंभ - पुणे शाखा**.. पृ.२

३. **पुणेकरांसाठी आवाहन - हितगुज वाटपाबाबत**... पृ.२
सौ. नीलांबरी रमेश, पुणे

४. **हितगुज समिती आवाहन**....................... पृ.२

५. **सुगीता मंडळाचे गीताष्टक**...................... पृ.४
जनार्दन गोविंद, आगाशी, जि. ठाणे

६. **वात्रटिका**.................................. पृ.४
मोरेश्वर हरि, शिरसई, गोवा

७. **परदेशांतल्या ब्राह्मण बंधूंना आवाहन**............ पृ.५
दिवाकर गोविंद विद्वांस, आगाशी, जि. ठाणे

८. **समुपदेशन - कुटुंबस्वास्थ्य टिकवण्याचा प्रभावी उपाय**...... सौ. मंगला प्रवीण, मुंबई पृ.६

९. **बोनस**...................................... पृ.७
विनायक केशव, वरळी

१०. **साक्ष (कविता)**............................ पृ.८
डॉ. सौ. सीमा श्याम, पुणे

११. **अंबेजोगाई यात्रीनिवास प्रकल्प**............... पृ.१०

१२. **२३ ठिपके २३ ओळी**....................... पृ.१०
सौ. मीना सदानंद, बांद्रा, मुंबई

१३. **त्रिदल (तीन) - कविता**...................... पृ.११
स्वाती अभ्यंकर, चिंचवड, पुणे

१४. **स्मरणातल्या कविता**......................... पृ.११
विजय अनंत, पुणे

१५. **गीतरामायण एक्स्प्रेस**....................... पृ.१२
गजानन भास्कर, घाटकोपर, मुंबई

१६. **फ्रिजमुळे विषबाधा**........................... पृ.१३
प्रेषक प्रमोद कृष्ण, ठाणे

१७. **अल्बर्ट आईनस्टाईनचा पत्ता**.................. पृ.१४
प्रेषक प्रमोद कृष्ण, ठाणे

१८. **दिवस असे भाग्याचे**.......................... पृ.१५
विनायक केशव, वरळी, मुंबई


याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३,४),
**खुशीपत्रे** (पृ.३,४,५,६), **हसरे हितगुज** (पृ.९),
आणि **विवाह सहाय्य** (पृ.११ ते १५)
ही नेहमीची सदरे.

**बुक पोस्ट**

**प्रति**


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan